


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शनिवार, दि. ०६ डिसेंबर २०२५




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०२३ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com




# गोलंदाजीसह नाणेफेकही निर्णायक!

## भारत-दक्षिण आफ्रिका तिसरा एकदिवसीय सामना आज; मालिका विजयाची संधी

**विशाखापट्टणम : (समर्थ गांवकरी)**

कसोटी मालिका गमावल्याने टीकेचे धनी ठरलेल्या भारतीय संघावर आता एकदिवसीय मालिकेतही अशाच नामुष्कीची टांगती तलवार आहे. हे लाजिरवाणे अपयश टाळायचे झाल्यास भारतीय संघाला आज, शनिवारी होणारा दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा तिसरा एकदिवसीय सामना जिंकणे बंधनकारक आहे. विशाखापट्टणम येथे होणाऱ्या या सामन्यात गोलंदाजांची कामगिरी, तसेच नाणेफेकीचा कौल निर्णायक ठरू शकेल. एकदिवसीय मालिकेतील पहिल्या दोन सामन्यांत भारतीय गोलंदाज प्रभाव पाडण्यात अपयशी ठरले. दोन्ही सामन्यांत मोठी धावसंख्या उभारल्यानंतरही भारताला संघर्ष करावा लागला. पहिल्या सामन्यात भारताने निसटता विजय मिळवला, पण दुसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकन फलंदाजांच्या झंझावातासमोर भारतीय गोलंदाज निष्प्रभ ठरले. भारतीय संघाने या दोन्ही सामन्यांत नाणेफेक गमावले आणि याचाही त्यांना मोठा फटका बसला. विशेष म्हणजे, भारताने गेल्या २० एकदिवसीय सामन्यांत एकदाही नाणेफेक जिंकलेले नाही. भारतातील सामन्यांत रात्रीच्या वेळी दवाचा मोठा प्रभाव दिसून येतो. एकदिवसीय मालिकेतील पहिल्या दोन्ही सामन्यांत भारताला दुसऱ्यांदा म्हणजेच रात्रीच्या सत्रात गोलंदाजी करावी लागली. या वेळी दवामुळे मैदान आणि पर्यायाने चेंडू ओला झाला. या परिस्थितीत भारतीय गोलंदाजांना चेंडूवर नियंत्रण राखणे अवघड गेले. त्यातच यापूर्वी एकदिवसीय क्रिकेटमध्ये दोन वेगवेगळ्या चेंडूंचा वापर केला जात होता. त्यामुळे चेंडूचा टणकपणा कायम राहत होता. मात्र, आता नव्या नियमानुसार सुरुवातीची ३४ षटके दोन चेंडू वापरले जातात, त्यानंतर गोलंदाजी करणारा संघ यापैकी केवळ एका चेंडूसह अखेरची १६ षटके टाकतो. त्यामुळे चेंडू ओला झाला तरी तो बदलणे अवघड जाते. अशा वेळी नाणेफेकीचा निकाल निर्णायक ठरू शकतो. आता भारतीय संघ नाणेफेक गमावण्याची मालिका खंडित




करून एकदिवसीय मालिकेत विजय मिळवणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

वेळ : दुपारी १.३० वाजता

थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स १, हिंदी २, जिओहॉटस्टार ॲप

भारतीय संघाने मायदेशात १९८६-८७ हंगामापासून एकाच प्रतिस्पर्ध्याविरुद्ध कसोटी आणि एकदिवसीय गमावलेली नाही. त्यावेळी पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानने भारताला कसोटी मालिकेत १-० असे, तर एकदिवसीय मालिकेत ५-१ असे पराभूत केले होते.

एकदिवसीय मालिकेपूर्वी रोहित शर्मा आणि विराट कोहली (रो-को) या भारताच्या माजी कर्णधारांबाबत सर्वाधिक चर्चा रंगली होती. या दोघांनीही एकदिवसीय संघातील आपले महत्त्व पुन्हा अधोरेखित केले आहे. रोहितने गेल्या चार डावांत एक शतक आणि दोन अर्धशतकी खेळी केल्या आहेत. दुसरीकडे, कोहलीनेही दक्षिण आफ्रिकेविरुद्ध दोन्ही सामन्यांत शतक साकारले. आता त्याचा शतकांची हॅट्ट्रिक साजरी करण्याचा मानस असेल. कोहलीने यापूर्वी एकदा अशी कामगिरी केली आहे. विशाखापट्टणम हे कोहलीच्या सर्वांत आवडत्या केंद्रांपैकी एक आहे. येथील मैदानावर कोहलीने चार एकदिवसीय आणि एक कसोटी शतक साकारले आहे. त्यामुळे आता त्याच्या कामगिरीकडेच चाहत्यांचे विशेष लक्ष असेल. तसेच गेल्या सामन्यातील शतकवीर ऋतुराज गायकवाड कामगिरीत सातत्य राखण्याचा प्रयत्न करेल.

## थोडक्यात...

### बाबासाहेबांचा मूलमंत्र आजही मार्गदर्शक

चेंबूर (समर्थ गांवकरी) : "शिका, संघटित व्हा" हा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला मूलमंत्र आजही समाजाला दिशा देतो. भारताची सार्वभौम राज्यघटना बाबासाहेबांनी अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने तयार केली असून, या संविधानाच्या बळावरच देशातील सर्वसामान्य नागरिकाला न्याय मिळतो आणि देशाचा कारभार लोकशाही मार्गाने सुचारुपणे चालतो, असे उद्गार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले. चेंबूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात आयोजित 'भीम ज्योत' लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमात स्थानिक जनप्रतिनिधी, आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. देशातील दलित, शोषित, वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी बाबासाहेबांनी आयुष्यभर संघर्ष केला. समाजातील सर्वात शेवटच्या व्यक्तीपर्यंत न्याय पोहोचणे हा बाबासाहेबांचा मुख्य संदेश होता, असे शिंदे यांनी सांगितले.

### तरुणाची तलवारीने निर्घृण हत्या


चंद्रपूर (समर्थ गांवकरी) : आपल्या पूर्व पत्नीला भेटायला आलेल्या तरुणाची तिच्या पतीने धारदार तलवारीने हत्या केल्याची खळबळजनक घटना शुक्रवारी सायंकाळी 8 वाजताच्या सुमारास राजुरा तालुक्यातील हरदोणा येथे घडली. राजेश नारायणलाल मेधवानी (40) राहणार बीलवाडा राजस्थान असे मृतकाचे नाव आहे. राजुरा पोलिसांनी अवघ्या दीड तासात हत्येचा छडा लावून चंद्रप्रकाश मेघवंशी यास ताब्यात घेतले आहे.

# पुतिन यांच्या स्नेहभोजनला राहुल गांधी, खरगेंना निमंत्रण नाही

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची भेट घेण्यापासून विरोधी पक्षाच्या नेत्यांना परावृत्त केले जात आहे, असा आरोप लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गुरूवारी केला होता. आज (शुक्रवार, ५ डिसेंबर) व्लादिमीर पुतिन यांच्यासाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले असून अनेक मान्यवरांना निमंत्रित केले जाणार आहे. या स्नेहभोजनासाठी राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांना निमंत्रित करण्यात आलेले नाही, अशी





बातमी सूत्रांच्या हवाल्याने दिली आहे. मात्र काँग्रेसच्या दुसऱ्या एका नेत्याला बोलविण्यात आल्याची शक्यता वर्तवली आहे. राष्ट्रपतींच्या निवासस्थानी पुतिन यांच्यासाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या सोहळ्याला अनेकांना निमंत्रित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांना निमंत्रित केले नसले तरी खासदार शशी थरूर यांना मात्र बोलविण्यात आल्याची माहिती इंडिया टुडेने आपल्या वृत्तात दिली आहे.

शशी थरूर यांची सरकारशी गट्टी, स्वपक्षाशी मात्र दुरावा काँग्रेसचे खासदार शशी थरूर हे मागच्या सहा महिन्यांपासून स्वपक्षापासून दुरावले आहेत.

केंद्राने ऑपरेशन सिंदूर राबविल्यानंतर त्याची महती विदेशात जाऊन सांगण्याच्या शिष्टमंडळात शशी थरूर यांच्या समावेशाला काँग्रेसने विरोध केला होता.

## सरकार, विरोधकांमध्ये निमंत्रणनाट्य

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

व्लादिमिर पुतिन यांच्यासाठी शुक्रवारी राष्ट्रपती भवनात आयोजित केलेल्या स्नेहभोजनाला लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधी तसेच राज्यसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना निमंत्रण देण्यात आले नाही. मात्र, काँग्रेसचे ज्येष्ठ खासदार शशी थरूर यांना 'विशेष अतिथी' म्हणून आमंत्रित केले गेले. या निमंत्रणनाट्यावरून काँग्रेस आणि केंद्र सरकार यांच्यात राजकीय वाद निर्माण झाला. राष्ट्रप्रमुखांसाठी आयोजित केलेल्या भोजन समारंभासारख्या शिष्टाचाराच्या कार्यक्रमांमध्ये संसदेतील विरोधी पक्षनेत्यांना आमंत्रित केले जाते.

मात्र, यावेळी केंद्र सरकारने जाणूनबुजून राहुल गांधी व खरगेंना निमंत्रण दिले नाही, असा आरोप काँग्रेसने केला.

शशी थरूर यांनी त्यांना निमंत्रण मिळाल्याची पुष्टी केली. "मला निमंत्रण मिळाले आहे. मी उपस्थित राहणार आहे," असे त्यांनी सांगितले. थरूर यांना निमंत्रण दिल्याबद्दल काँग्रेस नेत्यांनी नाराजी व्यक्त केली असून पक्षातील अंतर्गत तणाव वाढल्याचे संकेत मिळू लागले आहेत.

# 'मतचोरी' विरोधात काँग्रेसची रॅली; मातोश्रीवर येऊन दिले निमंत्रण

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते खा. दिग्विजय सिंह यांनी मातोश्री निवासस्थानी उद्धवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. काँग्रेसने मुंबई महापालिका निवडणूक स्वबळावर लढविण्याची घोषणा केल्यानंतर प्रथमच काँग्रेसचे बडे नेते मातोश्रीवर गेल्याने या नेत्यांमध्ये राजकीय चर्चा झाल्याचे समजते. महापालिका निवडणूक उद्धव ठाकरे व राज ठाकरे हे एकत्रित लढविण्याची शक्यता आहे. तसेच, राज ठाकरे यांना महाविकास आघाडीत सामील करून घेण्याबाबत उद्धव ठाकरे प्रयत्नशील आहेत. त्याला काँग्रेसचा विरोध आहे. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर दिग्विजय सिंह यांनी मातोश्रीवर जाऊन घेतलेली उद्धव ठाकरेंची भेट महत्त्वाची मानली जात आहे. दिल्लीतील रामलीला मैदानावर मतचोरी विरोधात काँग्रेसची एक महारॅली होत असून, या रॅलीत



सहभागी होण्याचे निमंत्रण उद्धव ठाकरे यांना देण्यात आल्याचे समजते. या रॅलीत उद्धव ठाकरे सामील होणार का, याबाबत राजकीय वर्तुळात काही कयास बांधले जात आहेत. १४ डिसेंबर रोजी काँग्रेसची ही महारॅली होणार आहे.

दिल्लीतील रामलीला मैदानावर काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या 'मत चोरी' विरोधातील महारॅलीमध्ये उद्धव ठाकरे यांनी सहभागी व्हावे, यासाठी त्यांना निमंत्रण देण्यात असल्याचे म्हटले जात आहे.

# नेहरूंची निंदानालस्ती हेच मुख्य उद्दिष्ट : सोनिया गांधी

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

देशाचे प्रथम पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचा सामाजिक आणि राजकीय पाया केवळ पुसून टाकण्याचा नव्हे, तर पूर्णपणे नष्ट करण्याचा विद्यमान सत्ताधाऱ्यांचा मुख्य उद्देश आहे, अशी टीका काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी शुक्रवारी केली. त्यासाठी नेहरूंची मोठ्या प्रमाणात बदनामी केली जात आहे, असे गांधी म्हणाल्या. दिल्लीमधील जवाहर भवन येथे नेहरू केंद्राचे शुक्रवारी उद्घाटन करण्यात आले. या सोहळ्यात बोलताना सोनिया गांधी म्हणाल्या, "जवाहरलाल नेहरू यांना बदनाम करणे, विकृतीकरण करणे, कमी लेखणे आणि चारित्र्यहनन करणे यासाठी पद्धतशीर प्रयत्न केले जात आहेत आणि हे अजिबात खपवून घेतले जाणार नाही."

"नेहरूंच्या बदनामी मोहिमेमागे त्यांची प्रतिमाहनन करणे हे एकमेव उद्दिष्ट नाही तर संपूर्ण जगाने मान्य केलेले, देशाच्या स्वातंत्र्य चळवळीतील



त्यांचे कार्य नाकारणे हाही हेतू आहे. स्वतःच्या सोयीने इतिहासाचे पुनर्लेखन करण्यासाठी नेहरूंच्या वारसा नष्ट करण्याचा प्रयत्न केला जात आहे," अशी टीका सोनिया गांधी यांनी केली.

सत्ताधारी पक्ष जो सामाजिक, राजकीय आणि आर्थिक पाया नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहे, त्यावरच आपल्या देशाची बांधणी आणि उभारणी झाली आहे, असे सोनिया म्हणाल्या. नेहरू हे आधुनिक भारताचे शिल्पकार होते, त्यांचा आर्थिक वाढीच्या नियोजनावर अढळ विश्वास होता आणि ते वैज्ञानिक व तंत्रज्ञान क्षमता विकसित करण्याबरोबरच विज्ञाननिष्ठ विचारांसाठी कटिबद्ध होते, अशा शब्दांमध्ये सोनिया गांधी यांनी नेहरूंचे स्मरण केले.

नेहरूंचा धर्मनिरपेक्षतेवर ठाम विश्वास होता. देशाचे ऐक्य मजबूत करतानाच भारताची विविधता जपणे आणि त्याविषयी ममत्व बाळगणे हीच त्यांच्यासाठी धर्मनिरपेक्षता होती. त्यांच्या वारशामुळे आजही आपले जीवन घडत आहे, अशी कृतज्ञता सोनिया गांधींनी व्यक्त केली.

> नेहरूवादाच्या वारशाचे बचावात्मक पवित्रा न बाळगता जोरदार संरक्षण करणे ही केवळ स्मरणरंजनाची कृती नाही. तर ही भारताचे घटनात्मक वचन पुन्हा अंमलात आणणे, दुष्प्रचाराच्या काळात तर्काचे रक्षण आणि आपले संघराज्य आधुनिक व प्रगतशील विचारांचे असेल याची खबरदारी घेणे यासाठी कटिबद्धता आहे.
> **– सोनिया गांधी, नेत्या, काँग्रेस**

# वृक्षतोडीच्या वादात भाजप एकाकी

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

तपोवनात साधुग्राम वसविण्यासाठी प्रस्तावित वृक्षतोडीच्या मुद्द्यावरून उफाळलेल्या वादात भाजप एकाकी पडला आहे. मित्रपक्ष राष्ट्रवादी (अजित पवार) पाठोपाठ आता शिवसेनेने (एकनाथ शिंदे) त्यांची कोंडी केली. कुंभमेळामंत्री उपसमितीत मोठ्या प्रमाणात वृक्ष तोडावे लागतील, यावर चर्चाच झाली नसल्याचे शिवसेना शिंदे गटाने उघड केल्याने भाजप अडचणीत आला आहे. कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या साधू-महंतांच्या निवासासाठी साधुग्राम उभारले जाते. त्यासाठी तपोवनात ५४ एकरवरील चिन्हांकित १८२५ पैकी किमान एक हजार वृक्ष तोडावे लागतील. यासंदर्भातील आंदोलनाची धग वाढल्यानंतर महायुतीतील मित्रपक्षांनी सावध पवित्रा घेतला. तपोवनातील एकही झाड तोडू दिले जाणार नाही, अशी भूमिका मांडत कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांना धारेवर धरणारे अभिनेते सयाजी शिंदे यांचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समर्थन केले. अजित पवार गटानंतर आता शिवसेना शिंदे गट तपोवन वाचवा मोहिमेत उतरला आहे. कुंभमेळा नियोजनासाठी स्थापन केलेल्या



कुंभमेळामंत्री उपसमितीत गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रवादीचे (अजित पवार) छगन भुजबळ आणि ॲड. माणिकराव कोकाटे, शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) दादा भुसे आणि उदय सामंत, भाजपचे जयकुमार रावल आणि शिवेंद्रसिंह भोसले हे सदस्य आहेत. समिती स्थापन झाल्यापासून आतापर्यंत एकच बैठक झाली आहे. मंत्री उपसमिती बैठकीत साधुग्रामच्या विषयावर चर्चा झाली असली तरी वृक्षतोडीसंदर्भात सविस्तर चर्चा झाली नसल्याचा पवित्रा घेण्यामागे शिंदे गटाने महापालिका निवडणुकीची समीकरणे नजरेसमोर ठेवली आहेत.

> कुंभमेळामंत्री उपसमितीच्या बैठकीत किती झाडे तोडावी लागतील, यावर चर्चा झालेली नाही. साधुग्रामसाठी इतक्या मोठ्या प्रमाणात झाडे तोडण्याची आवश्यकता नाही. नियोजनात अडचणच होत असेल तर, बोटावर मोजता येतील इतक्या झाडांबाबत नव्या तंत्राने पुनर्रोपणासारख्या पर्यायावर विचार करता येईल.
> **– दादा भुसे, कुंभमेळामंत्री उपसमिती सदस्य तथा शिक्षणमंत्री**



## विश्वकर्मा अपंग मानव सेवा संघ आयोजित

# वर्ल्ड डेफ अँड हार्ड ऑफ हिअरिंग डे कार्यक्रम उत्साहात संपन्न!

- दादर शिवाजी मंदिर नाट्यगृहात भव्य आयोजन
- दिव्यांगांसाठी आश्रम उभारणीचे आश्वासन!




**दादर : (समर्थ गांवकरी)**

५ डिसेंबर २०२५ रोजी विश्वकर्मा अपंग मानव सेवा संघ रजिस्टरतर्फे वर्ल्ड डेफ अँड हार्ड ऑफ हिअरिंग डे निमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन दादर येथील शिवाजी मंदिर नाट्यगृहात करण्यात आले. समाजातील सर्व घटकांना जोडणारा आणि दिव्यांगांच्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण करणारा हा उपक्रम प्रभावी ठरला. प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला शोभा: कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. यात समाजसेवक श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणवाला, संत श्री ब्रिजभूषणदास महाराज, श्री फिरोजभाई मालाड, श्री दिनेश हिम्मतभाई ठक्कर, श्री प्रकाश भारतीजी, श्री संदीप मेहता, राजेंद्र पांडे, अधिवक्ता बी. एम. चौरे, सुरेश रेवणकर यांचा समावेश होता. अध्यक्ष श्री प्रकाश भारतीजी यांनी सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत आणि सन्मान केला. नानजीभाई ठक्कर यांची महत्त्वपूर्ण घोषणा: उपस्थितांना मार्गदर्शन करताना समाजसेवक श्री नानजीभाई ठक्कर म्हणाले : "येणाऱ्या सहा ते सात महिन्यांत आम्ही प्रत्येक दिव्यांगासाठी स्वतंत्र जागा शोधून त्यांच्यासाठी आश्रम उभारणार आहोत." "वैद्यकीय सुविधा, अन्न, पाणी यांची योग्य व्यवस्था करून त्यांना स्वावलंबी बनविण्यावर आमचा भर असेल. कोणावरही अवलंबून राहण्याची गरज नाही."

त्यांनी पुढे सांगितले की— त्यांच्या संस्थेमार्फत चालवल्या जाणाऱ्या ९०० खाटांच्या बहुउद्देशीय रुग्णालयात सर्व उपचार मोफत केले जातात. अँजिओग्राफी, बायपास सर्जरी यांसारख्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियाही जात-धर्म न पाहता विनामूल्य केल्या जातात. तसेच, दरमहा अन्नदान, सर्व समाजघटकांच्या लग्नांमध्ये मदत, ठाण्यातील ब्राह्मण परिसरात पशुवैद्यकीय दवाखान्याचे संचालन, अशी अनेक सेवा संस्था निरंतर पुरवत असल्याचे त्यांनी नमूद केले.

"आपल्या मुलांना उच्च शिक्षण द्या, हेच भविष्याचे भांडवल आहे," असा संदेशही त्यांनी दिला.

कार्यक्रमात आदरणीय श्री नानजीभाई ठक्कर यांनी सुरेश प्रभू यांचा विशेष सन्मान केला. इतर मान्यवरांचे मार्गदर्शन, अधिवक्ता बी. एम. चौरे, सुरेश रेवणकर, तसेच संत ब्रिजभूषणदास महाराज यांनी दिव्यांगांसाठी भक्कम आश्रम उभारणीची आवश्यकता अधोरेखित केली. त्यांच्या म्हणण्यानुसार, उद्दिष्ट एकच, "अपंग व्यक्तींना सुरक्षित, सन्मानजनक आणि आनंदी जीवन मिळावे!" डॉ. विश्वासराव आरोटे कार्यक्रमास प्रत्यक्ष उपस्थित नसले, तरी त्यांनी दिव्यांगांसाठी योग्य जागा उपलब्ध करून देण्याचे आणि महत्त्वपूर्ण योगदान देण्याचे आश्वासन दिले.

# विविध ठिकाणी श्रीमद् भागवत कथा प्रारंभ!

- ज्येष्ठ उद्योजक व शिक्षणमहर्षी नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या प्रेरणेने धार्मिक उत्साह!



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे शहरातील विविध भागांमध्ये श्रीमद् भागवत कथेचे भव्य आयोजन ज्येष्ठ उद्योजक व शिक्षण महर्षी नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या प्रेरणेने सुरू करण्यात आले आहे. शहरातील धनलक्ष्मीबेन ठक्कर ठाणावाला सभागृह, अंबिका विद्यामंदिर, डिसोजा वाडी, शिवाजीनगर, वागळे इस्टेट आदी ठिकाणी ही भागवत कथा भक्तिमय वातावरणात सुरू झाली आहे. या पवित्र कथेस डॉ. संत भूज भूषण दास महाराज (वृंदावन) यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभणार असून, कार्यक्रमाच्या शुभारंभी दिनेशभाई हिम्मतभाई ठक्कर (मालाड), हरिभक्त परायण नाना महाराज देशमुख, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र पांडे, माजी प्राचार्य राजेंद्र पुराणी यांचे शुभहस्ते दीपप्रज्वलन करण्यात येणार आहे.

दरम्यान, दुसरी कथा आज नानजी भाई ठक्कर ठाणावाला सभागृहात संपन्न होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. ठाणे शहरातील हर भोले आश्रम, ओवळा गाव, घोडबंदर परिसरातही या धार्मिक सोहळ्यांचे आयोजन करून भक्तांना अध्यात्मिक ज्ञानाचा लाभ मिळत आहे. या कार्यक्रमास श्रीराम फाउंडेशनचे अध्यक्ष व भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते राम ठाकूर यांचीही प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. यावेळी आयोजकांनी ठक्कर ठाणावाला प्रतिष्ठान व ग्रामीण भागातील सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.



# जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील यांची डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या समवेत सौजन्य भेट!

**अहिल्यानगर, शिर्डी (समर्थ गांवकरी)**



अहिल्यानगर शिर्डी येथील जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील यांची सदिच्छा भेट घेऊन विविध महत्त्वाच्या विषयांवर फलदायी चर्चा करण्यात आली. माहिती विभागाच्या कामकाजासोबतच स्थानिक प्रशासन, पत्रकारिता आणि जनसंपर्क याबाबत सविस्तर संवाद साधण्यात आला. यावेळी दैनिक समर्थ गांवकरी दिवाळी अंक त्यांना भेट देऊन सत्कार करण्यात आला. हा सत्कार महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरी चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, पत्रकार पंढरीनाथ पगार, दैनिक समर्थ गांवकरी समूह चे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर, तसेच शिर्डी प्रतिनिधी राहुल फुंद यांच्या हस्ते संपन्न झाला.

या भेटीनिमित्त जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील यांनी दिलेली मार्गदर्शनपर मते पत्रकार बांधवांसाठी प्रेरणादायी ठरली आहेत. स्थानिक प्रशासन आणि पत्रकारिता क्षेत्रातील परस्पर सहकार्यामुळे जनतेपर्यंत अचूक व सकारात्मक माहिती पोहोचण्यास मोठी मदत होणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## रक्तदान शिबिराचे आयोजन!

**खर्डी : (समर्थ गांवकरी)**

सोनुभाऊ बसवंत महाविद्यालय, शहापूर जि. ठाणे येथे दि. ९ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी ठिक १०: ०० ते दुपारी ३: ०० वाजेपर्यंत महाविद्यालतील अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्ष, एन. सी. सी., एन. एस. एस., सांस्कृतिक विभाग, स्पोर्टस् विभाग, आणि महिला विकास कक्ष व एच. डी. एफ. सी. बँक (परिवर्तन), आणि सर जे. जे. महानगर रक्तपेढी, मुंबई (शासकीय रक्तपेढी) यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी जास्तीत जास्त रक्तदात्यांनी रक्तदान करावे, असे अवाहन आयोजकांनी केलेले आहे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, एका रक्तदात्यामुळे अनेक जीव वाचू शकतात. तसेच रक्तदान म्हणजे जीवनदान आहे, हे लक्षात घेऊन अधिकाधिक आजी व माजी विद्यार्थ्यांनी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी, तसेच स्थानिक नागरिक इत्यादींनी या शिबिरामध्ये सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या रक्तदान शिबिरासाठी महाविद्यालयात आवश्यक त्या सर्व सोयीसुविधांची तयारी करण्यात आली असून सर जे. जे. महानगर रक्तपेढी, मुंबई (शासकीय रक्तपेढी) येथील अनुभवी वैद्यकीय पथक या रक्तदान शिबिरासाठी उपस्थित राहणार आहे.

# "शांततेच्या मार्गाने राजकारण करणं हा तालुक्याचा पिंड"

**आमदार काशिनाथ दाते सर**

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



शुक्रवार दि. ५ डिसेंबर २०२५ गेल्या वर्षभरात पुन्हा एकदा नव्याने शांततेच्या मार्गाने विकासाभिमुख राजकारणाची दिशा पारनेर तालुक्यात मजबूत झाल्याचे अनेकजण बोलत आहेत. एक वर्षापूर्वीची परिस्थिती आणि आजची परिस्थिती यात झालेला बदल सर्वांनाच अगदी स्पष्टपणे जाणवत असून स्वर्गीय आमदार वसंतराव झावरे, बाबासाहेब ठुबे यांसारख्या अनेक दिग्गजानी शांततेच्या मार्गाने तालुक्यात राजकारण केलं, शांततेच्या मार्गाने राजकारण करणं हा तालुक्याचा पिंड असून मी ही गेल्या वर्षभरात शांतता व संयमाच्या मार्गाने मध्यंतरीच्या काळात तालुक्याची भरकटलेली राजकीय दिशा विकासाभिमुखतेकडे वळविण्याचा कसोशीने प्रयत्न करत असल्याचे पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी वडगाव सावताळमध्ये २५ लक्ष रुपयांच्या विविध विकासकामांच्या भुमिपूजन प्रसंगी सांगीतले.

यावेळी माजी सरपंच भाऊसाहेब शिंदे, उपसरपंच रुपाली वाणी, भाऊ जांभळकर, माजी चेअरमन हनुमंत ठाणगे, गोरक्ष रोकडे, माजी चेअरमन बाबा दाते, माजी चेअरमन रामचंद्र रोकडे, भाऊसाहेब खामकर, दत्तात्रय सरोदे, युवती तालुका प्रवक्त्या जयश्री प्रदीप रोकडे, नंदू खामकर, राजेंद्र रोकडे, गणेश जाधव, बाळासाहेब रोकडे, महादू रोकडे, संदीप झावरे, सागर करगळ, गणेश हरिभाऊ रोकडे, गणेश दगडू रोकडे, शिवाजी जाधव, सुनिल रोकडे, माजी सरपंच दामू पवार, पोपट सरोदे, अण्णा दाते, बाळू शिंदे, प्रदीप रोकडे, मारुती देशमुख, राहुल सरोदे, सुंदर रोकडे, ग्रामपंचायत सदस्य बाबासाहेब शिंदे महाराज, मंगेश खामकर, राहुल भोबाळ मेजर, ग्रामपंचायत सदस्य किरण सरोदे, गौतम रोकडे, दशरथ रोकडे, मोरे मॅडम, संगीता सरोदे, अनिता सरोदे, पै.तन्वी सरोदे, दत्तात्रय भोबाळ, नितीन भोबाळ, कैलास भोबाळ, मारुती देशमुख, माधु रोकडे, आदेश साळवे, बाबाजी सरोदेयांसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भूमिपूजन संपन्न झालेल्या विकासकामांमध्ये वडगाव सावताळ येथील स्मशानभूमी कॉंक्रिटीकरण (१० लाख), रस्ता कॉंक्रिटीकरण काम (१० लाख) आणि हनुमान मंदिर लाईटिंग (५ लाख) अशा एकूण २५ लाखांच्या निधीतून ही विकासकामे मंजूर करण्यात आलेली असून या कामांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीस लगेचच सुरुवात करण्यात आली. सबंधित कामे मार्गी लावल्यामुळे व नव्याने मागणी केलेली विविध कामे लवकरात लवकर मार्गी लावणार असल्याचा विश्वास उपस्थितांना दिल्याने मौजे वडगाव सावताळ व परिसरातील नागरिकांनी आमदार दाते सरांचे आभारही यावेळी व्यक्त केले.

पुढे बोलताना, विधानसभा निवडणुकीच्या वेळी आपल्या कुटुंबातील एक घटक म्हणुन ज्या पद्धतीने वडगाव सावताळ गावातील जनता माझ्या पाठीशी खंबीरपणे उभी राहीली तितक्याच किंबहुना त्याहून अधिक ताकदीने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे. राजकीय आकसापोटी स्वार्थाने प्रेरित होऊन अनेकजण गावात येतील गटातटात संघर्ष भडकविण्याचा प्रयत्नही करतील परंतु आपण त्यांच्यापासून दूर राहुन शांतता व संयमाची निवडलेली वाट कुठल्याही परिस्थितीत सोडायची नाही, ह्याची प्रत्येकाने काळजी घ्यायला हवी असेही त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले.





## ज्येष्ठ समाजसेवक नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या शुभहस्ते विणापुजन; १९ वर्षांची पवित्र परंपरा आजही कायम!

# ठाणे शहरात अखंड हरिनाम सप्ताहाचा भव्य सोहळा!



**ठाणे (समर्थ गांवकरी)**

वारकरी परंपरेने सिंचित झालेल्या ठाणे शहरात भक्तिरसाचा जल्लोष अधिक वृद्धिंगत झाला आहे. राम कृष्ण हरी वारकरी संप्रदाय भजनी मंडळ व ज्ञानेश्वरी महिला भजन मंडळ, माजीवाडा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचा भव्य प्रारंभ आज पवित्र वातावरणात संपन्न झाला.

ज्येष्ठ समाजसेवक, उद्योजक व समाजसुधारक नानजीभाई खेमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या शुभहस्ते विधिवत विणापूजन करण्यात आले आणि हरिनाम सप्ताहाची सुरुवात झाली.

सोहळ्याच्या उद्घाटनाला महाराष्ट्रातील महत्त्वाच्या क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लक्षणीय होती.

यामध्ये,

हरिभक्त परायण चंद्रकांत महाराज डुंबरे (संस्थापक अध्यक्ष – माळशेज नागरी सहकारी पतसंस्था)

उद्योजक गणपत शेठ मालुसरे.

हरिभक्त परायण दिनकर महाराज पाचंगे.

माजी नगरसेवक रविंद्र पाटील.

माजी नगरसेवक डिसोजा.

अनिल दोंदे महाराज.

माजी नगरसेविका सौ. निशा पाटील.

जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष रत्नाकर पवार.

उद्योजक रोहिदास जाधव.

आधार पतपेढीचे अध्यक्ष भरत शेठ दांगट.

आदी मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटनाच्या क्षणी मंत्रोच्चार, ढोल-ताशांचा नाद आणि हरिनामाचा गजर यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसाच्या वातावरणात न्हाऊन निघाला.

१९ वर्षांच्या परंपरेचा भावनिक वारसा:

गेल्या 19 वर्षांपासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन या ठिकाणी होत आहे. शहरातील वारकरी भाविकांना भक्तीचा जागर निर्माण करण्याचा हा सोहळा ठाणे शहरातील एक भव्य अध्यात्मिक पर्वणी ठरला आहे.

ठाणे शहरासह ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात भक्तगण या सोहळ्यात सहभागी होत असतात.

दररोज: पहाटे ४ ते ६ – काकडा आरती.

दुपारी २ ते ४ – महिला भजन.

सायं. ४ ते ६ – हरिपाठ.

रात्री ७ ते ९ – हरिकीर्तन.

अशा भक्तिमय कार्यक्रमांचे आयोजन संपूर्ण आठ दिवस चालते.

किर्तन कार्यक्रमांचे वेळापत्रक:

या वर्षी विविध ठिकाणांहून कीर्तनकार उपस्थित राहून हरिनामाचा महिमा सर्वत्र पोहोचवणार आहेत:

तारीख आणि कीर्तनकार:

05/12/2025 हरिभक्त परायण रामदास महाराज थोरात.

06/12/2025 हरिभक्त परायण बाळकृष्ण महाराज चोरगे.

07/12/2025 हरिभक्त परायण अमित महाराज अग्रे.

08/12/2025 हरिभक्त परायण अविनाश महाराज परळीकर, बीड.

09/12/2025 हरिभक्त परायण सौ. प्रीतीताई पाटील (भिवंडीकर)

10/12/2025 हरिभक्त परायण महादेव महाराज गुळिंग (ठाणे)

11/12/2025 हरिभक्त परायण जितेंद्र महाराज बाविस्कर (कल्याणकर) 12/12/2025 सांगता: काल्याचे कीर्तन

हरिभक्त परायण चंद्रकांत महाराज डुंबरे "वारकरी संप्रदाय – जगाला संस्कृतीचा आदर्श" नानजीभाई ठक्कर!

उद्घाटन सोहळ्यात बोलताना नानजीभाई ठक्कर म्हणाले:

"वारकरी संप्रदाय ही चळवळ संपूर्ण जगाला एक आदर्श देणारी संस्कृती आहे. समाजप्रबोधन, समता, प्रेम, भक्ती आणि एकोप्याचे संदेश देणारा हा मार्ग प्रत्येकाला समाधानाकडे नेतो."

ते पुढे म्हणाले – "किर्तनकार महाराजांनी जे मानधन मिळेल तेवढ्याने समाधानी राहावे. हे दान परमेश्वराच्या मार्गासाठी आहे. संत परंपरा टिकली पाहिजे."

"महिला वारकरींचा पुढाकार प्रेरणादायी" डुंबरे महाराज!

हरिभक्त परायण चंद्रकांत महाराज डुंबरे यांनी महिलांच्या भजन मंडळाच्या कार्याचे विशेष कौतुक केले.

"१९ वर्षांपासून महिला वारकरी संप्रदाय शहरी भागात हरिनाम सप्ताहाचे आयोजन मनापासून करत आहेत. ही परंपरा समाजाला प्रेरणा देणारी आहे," असे त्यांनी नमूद केले.

संयोजन समितीची भव्य तयारी:या सोहळ्याच्या आयोजनात खालील पदाधिकारी मोलाची भूमिका बजावत आहेत:

अध्यक्ष : सौ. नंदा परशुराम सडाके.

उपाध्यक्ष : अंबादास खोले.

सचिव : सौ. लता बाळकृष्ण लखापते.

उपसचिव : ह.भ.प. बाबाजी शेंडकर.

खजिनदार : श्रीमती चंद्रभागा भोसले.

उपखजिनदार : परशुराम गणपती सडाके.


समाजातील विविध क्षेत्रातील भक्त, उद्योजक, व्यावसायिक व व्यापाऱ्यांनी या सोहळ्यासाठी उत्साहात सहकार्य केले आहे.

## भाविकांना उपस्थित राहण्याचे आवाहन

हरिभक्त परायण ज्योतीराम काटकर, बापूसाहेब लंके, प्रमोद खिलारे, शशिकांत साळुंखे, बाळासाहेब कुंभार, दिलीप कासार, बबनराव थोरात, हरिश्चंद्र शिंदे, बंडू मोरे, सौ. शकुंतला भारती, सौ. नयनाताई डुंबरे, सुजाताई लंके, सौ. नंदाताई विश्वासराव, श्रीमती बेबी केसरकर, श्रीमती सुशीला चौरे, श्रीमती अलका गाडे, श्रीमती शालन काकडे, मीराबाई आगरे, श्रीमती सुलोचना पवार, विजय सुळे, श्रीमती अंजना पुशीलकर, सौ. कमल जाधव, सिंधुताई शेवाळे, संजना बांगर, सौ. अलकाताई सोनवणे आदींनी सर्व भक्त मंडळींना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. हा अखंड हरिनाम सप्ताह सोहळा संपूर्ण महाराष्ट्रातील वारकरी भक्तांसाठी एक वरदान ठरणार असून ठाणे शहर अध्यात्मिक उर्जेने पुनः पुन्हा उजळून निघत आहे.

# वनअधिकारी शहरात तर बिबट्या परिसरात

- तामसा परिसरात कृष्णापूर येथे शेतात शेतकऱ्यानी पाहिला बिबट्या
- रानडुक्कर रोही यांच्या त्रासाने शेतकरी भयभीत



तामसा : (समर्थ गांवकरी)

जिल्हातील हदगांव अर्धापुर किनवट माहूर भोकर हिमायतनगर तालुक्यात रोज ना रोज बहुतांश शेतकरी राजा ना बिबट्याचा आढळ होत असून रात्री बेरात्री जागल करणारे शेतकरी पिकाचे नुकसान करणारे वन्य प्राणी रानडुक्कर रोही हारण यांना पळवून लावण्यासाठी विवीध युक्ता शोधतात पण अचानक पणे बिबट्याचे आगमण झाल्यामुळे पिकांचे नुकसान झाले तर झाले त्यामुळे जिवाच्या भितीपोटी घरी बसून आहेत वनविभाग चे आधिकारी शहरात व बिबट्या चा मुक्त संचार खेड्यात अशी परस्थिती निर्माण झाली आहे. याबाबत सविस्तर वृतात असा की नांदेड जिल्ह्याचा उत्तर विभाग हा जंगल परीसराचा आहे विशेष करून मोठे जंगलं किनवट माहूर भोकर हदगांव हीमायतनगर तालुक्यात असून किनवट तालुक्याचा भूभाग हा तेलंगणा राज्याचा सिमावृती चा भाग आहे या जंगल परिसरात अप्पाराव पेठ गोडजेंवली गोंडे महागाव कंचेली मांडवी 'तोंटबा आदी गांवाचा समावेश येतो तर हिमायतनगर तालुक्यातील वाशी एकघरी पार्डी पवना टाकराळा पोटा हि गांवे सिमावृती परिसरात असून जंगल व्यापत आहेत तर हदगांव तालुक्यात तळ्याचीवाडी गवतवाडी माळ सावरगांव रावणगांव शेंदण डाक्याची वाडी धन्याचीवाडी कुसलवाडी जांभळा तरोडा राळावाडी चोरंबा केदरगुडा ठाकरवाडी वानवाडी मांडवा वारकवाडी खरटवाडी लोहा तांडा नाव्हा कृष्णापूर' आदी आदीवासी बहूल गावे ही जंगल व्यापत आहेत गेल्या आठ महिन्या पासुन वाघबोचा संचार कुठे दिसून आला नाही सतत पाऊसाळा होता म्हणून की काय? परंतु मागील एक महिन्या पासुन कुठे ना कुठे तरी शेतकरी राजाना दर्शन होत आहे परवा अर्धापूर तालुक्यात अनेक खेड्यातील शेतकऱ्यांना बिबट्या निदर्शनास आला अर्धापूर ते तामसा रोडवर पाटनुरचा जंगल म्हणून प्रख्यात आहे या जंगलात मोठ्या प्रमाणात वाघ वाघीन व बिबटे आसल्याचा संशय आहे रात्री बेरात्री चारचाकी वाहन घेऊन जाणाऱ्या प्रवाशास निदर्शनास येत आहेत त्यावर काहीतरी जिल्हा वनीकरण आधिकारी यांनी लक्ष घालून उपाययोजना करणे काळाची गरज आहे एकाद्या शेतकऱ्याचा बळी गेला की प्रशासन सज्ज होते तामसा परिसरात नाममात्र जंगल आहे परंतु जंगल परिसर आसलेल्या वानवाडी वारकवाडी या डोंगरात बसून आसलेली वाघोबाची टिम ग्रामीण भागाकडे वळली की काय दिनांक३ डिसेंबर ला तामसा परिसरात कृष्णापूर येथे बाबुराव खांडेकर यांच्या शेतात बिबटया दिसला असून त्याच रात्री दोन रोही ला वर हल्ला करून मारलं. बिबट्या चा मुक्तसंचार झाल्यामुळे शेतकरी शेतात भीतीच वातावरण निर्माण झालं आहे जंगल नष्ठ होऊन वन्यप्राणीच्या मुक्तसंचार झाल्यामुळे परिसरात दशहत निर्माण झाली आहे असा वनविभागात महिला कर्मचारी असल्यामुळे सुरक्षेचा प्रश्न पडतो. वारकवाडी वानवाडी खरटवाडी येथील मोठमोठे डोंगर पोखरून त्यांतील मुरुम तेलंगणाचा गुतेदार नेत असून रेलवेलाईन च्या कामासाठी वापर होत आहे त्यामुळे जंगले बेचिराख होत चालली आहेत त्या डोंगरावर असेलेली झाडे वनविभागाची कोणतेही परवानगी न घेता तोडली जात आहे तेंव्हा वनविभागान यातील गांभीर्य लक्षात घेऊन जंगल नष्ट न होऊ देता त्यावर लक्ष ठेवणे गरजच आहे चौकीदार व वनपाल यांच्या मध्ये मोठी आर्थिक उलाढाल होत आसल्याची चर्चा मोठ्या प्रमाणात एकावयास मिळत आहे तेंव्हा वरिष्ठ आधिकाऱ्या नी जंगले नष्ट करणाऱ्यावर योग्य ती कार्यवाही करावी.


# हरीश माळवे यांना 'उत्कृष्ट सोनार पुरस्कार' जाहीर!

राहुरीः (समर्थ गांवकरी)



लोणी येथील ख्यातनाम सराफ, सुवर्णकार समाजाचे माजी अध्यक्ष तसेच संत नरहरी महाराज चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त श्री हरीश देवरामशेठ माळवे (केलवडकर) यांना साई आदर्श मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, राहुरी यांच्या वतीने दिला जाणारा 'उत्कृष्ट सोनार पुरस्कार' जाहीर झाला आहे. या गौरवाबद्दल सोनार समाजासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी माळवे यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. श्री. हरीश माळवे यांचे सराफी व्यवसायातील प्रामाणिक काम, समाजातील सक्रिय सहभाग, परखड व पारदर्शक स्वभाव, आणि निस्वार्थ भावनेतून केलेले सामाजिक कार्य याची योग्य दखल घेत हा पुरस्कार जाहीर झाला असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. रंगनाथ उदावंत यांनी, "हरीश माळवे यांचे कार्य निश्चितच अभिनंदनीय असून समाजासाठी त्यांचा हातभार महत्त्वपूर्ण आहे," असे गौरवोद्गार काढले. रवि माळवे यांनी सांगितले की, "हरीश माळवे अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात अग्रेसर असून कोणत्याही अपेक्षेशिवाय लोकांसाठी झटणारा त्यांचा स्वभाव प्रेरणादायी आहे." तर बिग बी विजय माळवे यांनी, "कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत, व्यवसायातून वेळ काढून समाजकार्यात सर्वांना सोबत घेऊन चालणारे हरीश माळवे नेहमीच पुढाकार घेतात," असे मनोगत व्यक्त केले. यावेळी ज्ञानेश्वर साबळे, सोमनाथ आहेर, गुरुनाथ बोराडे, मेंजर शेवंते, अशोक मैड, अर्जुन टाक, चिंतामणी साहेब आदी मान्यवरांनीही माळवे यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. या पुरस्कार घोषणेने लोणी परिसरात समाधानाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# कारखान्यांनी शेतकऱ्यांचे पीक कर्ज ऊस पेमेंटमधून कापू नये अन्यथा संघर्ष करावा लागेल : किसान सभा



(समर्थ गांवकरी)

शेतकऱ्यांचे कर्ज परस्पर ऊस पेमेंटमधून कारखान्यांनी बँकांना वळते करून दिल्यास व त्यामुळे शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिल्यास शेतकऱ्यांच्या कर्जाची संपूर्ण जबाबदारी कारखान्यांना घ्यावी लागेल. शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिल्यास जो असंतोष भडकेल त्याची जबाबदारी सुद्धा कारखान्यांवर राहील. असे होऊ नये यासाठी कारखान्यांनी ऊस पेमेंटमधून परस्पर कर्ज वसूल करण्याची प्रक्रिया करु नये असे आवाहन किसान सभा व ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने करत आहोत.

**- डॉ अजित नवले, राज्यसचिव अखिल भारतीय किसान सभा, महाराष्ट्र**

शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज 30 जून 2026 च्या आत माफ करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. कर्जमाफी केवळ थकीत कर्जदारांची होते हा अनुभव आहे. राज्यात सध्या ऊस गळीत हंगाम सुरू आहे. उसाला रास्त पहिली उचल व भाव मिळावा यासाठी किसान सभा व ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने राज्यभर आंदोलने सुरू आहेत.

आंदोलनाचा परिणाम म्हणून लवकरच पहिली उचल शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग होईल. मात्र असे होताना बऱ्याचदा सहकारी बँका कारखान्यांना संपर्क करून शेतकऱ्यांचे कर्ज ऊसाच्या पहिल्या हप्त्यामधून किंवा पेमेंटमधून वसूल करून घेतात. परिणामी असे शेतकरी थकीत कर्जदार न राहता नियमित कर्जदार बनतात व कर्जमाफीच्या योजनेतून वगळले जातात.

साखर कारखान्यांनी या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचे कर्ज परस्पर ऊस पेमेंटमधून किंवा पहिल्या हप्त्यातून कापून घेऊ नये असे आवाहन किसान सभा व ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समिती करत आहे.


# श्री दत्त जयंती उत्साहात साजरी

किनवट : (समर्थ गांवकरी)

किनवट शहरात श्री दत्त जयंती मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात साजरी करण्यात आली. पहाटे पासून विविध देवस्थानांवर धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल सुरू झाली. श्री स्वामी समर्थ केंद्र मेन रोड किनवट, श्री दत्त मंदिर, श्री विठ्ठल रखुमाई मंदिर तसेच श्री गजानन महाराज मंदिर येथे अभिषेक, पुजापाठ, नित्योपचार, भजन-कीर्तन आदी कार्यक्रमांनी वातावरण पवित्र झाले. आज दि ५ डिसेंबर रोजी श्री स्वामी समर्थ केंद्र, मेन रोड किनवट येथे जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमांच्या समारोपानंतर अन्नदान करण्यात आले. तर श्री अय्यप्पा स्वामी मंदिर, माहूर रोड येथे पारंपरिक भव्य पडी पूजेचे आयोजन करण्यात आले असून महाप्रसाद भंडाऱ्यासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती.

# ज्येष्ठ पत्रकार विष्णू वाघ यांच्या कन्येला विवाह सोहळ्यात दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने गॅस कनेक्शन भेट!





श्रीरामपूर : (समर्थ गांवकरी)

ज्येष्ठ पत्रकार व दैनिक पुढारीचे श्रीरामपूर विभागीय संपादक विष्णू वाघ यांच्या कन्येच्या विवाह सोहळ्याला उपस्थित महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आणि दैनिक समर्थ गांवकरी परिवाराच्या वतीने एक आगळी-वेगळी सामाजिक भेट देण्यात आली.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर, तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे श्रीरामपूर शहर प्रमुख अमोल कदम यांच्या हस्ते वाघ यांच्या कन्येला घड्याळ व गॅस कनेक्शन प्रदान करण्यात आले. विवाह सोहळ्यात देण्यात आलेली ही भेट वाघ कुटुंबीयांसाठी आनंददायी ठरली असून त्यांच्या मुलीच्या नवजीवनाची सुंदर व सुखद सुरुवात म्हणून सर्व उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आणि दैनिक समर्थ गांवकरी समूहाकडून सामाजिक भान जपत केलेला हा उपक्रम विशेष दखलपात्र ठरला आहे.

# जिल्ह्यातील शेकडो कार्यकर्त्यांची केली गारा?

नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)

कार्यकर्ता जिंदा तो नेता जिंदा नही तो ना नेता रहेगा ना कार्यकर्ता नेत्याची शान म्हणजेच कार्यकर्ते यांचा गराडा असेल तोच नेता असेल कार्यकर्ता नाही तर नेता नाही असेच चित्र स्पष्ट होईल कार्यकर्ते यांच्याच जिवावर नेते मोठे होतात मात्र कार्यकर्ते यांना विसरून जातात हे चालणार नाही या सर्व बाबी कडे नांदेड जिल्ह्यातील सर्व आमदार खासदार विधान परिषद आमदार यांनी कार्यकर्ते यांनी उद्याच्या होणाऱ्या निवडणुकी मध्ये पराभुत झालेल्या कार्यकर्ते यांना खचून न जाऊ देता त्यांना धिर देऊन त्यांच्या पाठीशी खंबीर पणे उभे राहून त्यांना द्यावा कारण नेत्याचे भांडवल म्हणजेच एक सच्चा कार्यकर्ता त्याला जपावे अशी भावना अनेक वर्षा पासून नेत्याच्या पाठीशी उभे राहणाऱ्या शेकडो कार्यकर्ता यांचे भावना नेत्यांनी ओळखली पाहिजे नाहीतर कार्यकर्ते पण येत्या निवडणुकी मध्ये नेत्यांना त्यांची जागा दाखवल्या शिवाय राहणार नाहीत हे नेत्यांनी लक्षात ठेवावेत .

कार्यकर्त्याच्या निवडणुकीत नेते मंडळी एकमेकांवर करतात कुरघोडी ना आघाडी केली ना युती केली नेते मंडळीनी दिला स्वबळा चा नारा जिल्ह्यातील शेकडो कार्यकर्त्यांची केली गारा ? नेत्यांच्या निवडणुकीत युती व आघाडी केली जाती मात्र कार्यकर्त्यांच्या निवडणुकीत युती आणि आघाडी का नाही हाच सवाल सर्व सामान्य कार्यकर्त्यातुन जिल्ह्यातील नेत्यांना केला जात आहे निवडणुका आल्या की कार्यकर्ते हे नेत्यांच्या मागे खंबीर पणानी उभे राहणारे ते म्हणजे कार्यकर्ते असतात मात्र नेते लोक हे आप आपली विधानसभा निवडणुकीत व लोकसभा निवडणुकी मध्ये सर्व कार्यकर्ते यांचा पुरेपूर वापर करून घेणारे म्हणजे नेते असतात ते आमदार होतात खासदार होतात मंत्री होतात आणि आपल्या निवडणुकी च्या वेळी महायुतीतील पक्ष शिवसेना शिंदे गट . भाजपा . राष्ट्रवादी अजीत पवार गट असे की महाविकास आघाडीतील कॉग्रेस . शिवसेना उबाठा . राष्ट्रवादी कॉग्रेस शरद पवार गट हे सर्व पक्ष ते आपल्या सोई नुसार युती व आघाडी करीत असतात व आपण निवडून येण्यासाठी सोयीस्कर पणे काम करीत असतात मात्र निवडून आल्यावर कार्यकर्ते यांना वाऱ्यावर सोडले जातात मात्र नगर परिषद .नगर पालीका . महानगर पालीका . जिल्हा परिषद . पंचायत समिती . ग्रामपंचयत ही निवडणुक म्हणजे कार्यकर्ते यांची असते मात्र या निवडणुकी वेळी नांदेड जिल्ह्यातील नेते एकमेकांवर कुरघोडी करून युती व आघाडी होऊ देत नाहीत कारण कार्यकर्ते यांच्या निवडणुकी मध्ये सर्व सामान्य कार्यकर्ते हे बरबाद कसे झाले पाहिजे हेच नेत्यांचे ध्येय असते का ? कारण या निवडणुकी मध्ये अनेक ठिकाणी यूती व आघाडी झाली नसल्यामुळें शेकडे कार्यकर्ते यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होते व त्यांचे अनेकांचे संसार उद्धवस्त होतात तर अनेकांनी सावकारी कर्ज काढून निवडणुक लढवली जाते मात्र याची झळ नेत्याना नसते त्यांना एवढेच की मी तुम्हाला माझ्या पक्षा तर्फे तिकीट दिलो हेच बोलले जातात मात्र नेते मंडळी ना युती करतात ना आघाडी करतात सर्व नेते हे एकमेकांवर कुरघोडी करतात व मी बढा तु बढा हेच बढेपणा दाखवतात मात्र त्यामध्ये स्थानिक पातळी वरील नेत्यांच्या मागे खंबीर पणे ना उण .ना ताण . ना भुख . ना वारा . ना वादळ . ना पाणी . ना पाऊस . बघीतले जातात ते फक्त आणि फक्त नेत्यांन साठी लाठी काठी अंगावर घेऊन नेत्यांना निवडून आणण्या साठी दिवसाची रात्र रात्रीचे दिवस करूण जिवाचे रान करणारे कार्यकर्ते च असतात मात्र नेत्यांना या बाबीची जाणीव निवडणुकी पुर्तीच का असते हेच कळत नाही.

# प्रा. रणजीत राजळे यांना पीचडी

राहुरी : (समर्थ गांवकरी)



अहिल्यानगर जिल्हा मराठा संस्थेच्या नेप्ती येथील छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयात कार्यरत असलेले प्रा. रणजीत वसंतराव राजळे यांना श्री जगदीश प्रसाद विद्यापीठ, राजस्थान यांचे कडून पीएचडी प्रदान करण्यात आली आहे. मेकॅनिकल इंजीनियरिंग मधून 'मॅथेमॅटिकल मॉडेलिंग अँड ऑप्टिमायझेशन ऑफ सस्पेन्शन सिस्टम फॉर राईट कम्फर्टेबल अँड ह्यूमन हेल्थ क्रिटेरिया' या विषयावर विद्यापीठातील डॉ. चक्रधर गौड 'व डॉ. महेश नगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पीएचडी पदवी प्राप्त केली. प्रा. राजळे यांच्या या यशाबद्दल अहिल्यानगर जिल्हा मराठा संस्थेचे अध्यक्ष व सर्व विश्वस्त तसेच माजी खा. प्रसादराव तनपुरे, डॉ. तनपुरे कारखान्याचे अध्यक्ष अरुण तनपुरे, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे आदींसह मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# गणित, विज्ञान, चित्रकला प्रदर्शनाचे आयोजन

राहुरी : (समर्थ गांवकरी)



शिवांकुर विद्यालय कोंढवड या ठिकाणी गणित, विज्ञान, चित्रकला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे सचिव डॉ. प्रकाश पवार यांनी केले. या प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी गणित, विज्ञान विषयाचे आकर्षक मॉडेल तयार केले होते त्यामध्ये इयत्ता तिसरी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये शेतीवर आधारित अनेक मॉडेल विद्यार्थ्यांनी बनवले या सर्व प्रदर्शनाचे परीक्षण डॉ. प्रकाश पवार सर यांनी केले व या प्रदर्शनामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांचे व संबंधीत विषय शिक्षकांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

या प्रदर्शनासाठी संस्थेचे उपाध्यक्ष गणेश शेळके, विश्वस्त मंगलताई पवार, डॉ नरेंद्र इंगळे, डॉ. गौरी पवार, सौ मंगलताई पवार यांनी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे अभिनंदन केले.

या विद्यार्थ्यांना विद्यालयातील शिक्षिका सुनिता ढोकणे, भाऊसाहेब करपे, मोहिनी पेरणे, सुरेखा मकासरे यांचे मार्गदर्शन लाभले.

या विज्ञान प्रदर्शनास शिवांकुर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका छाया जाधव, पर्यवेक्षक अरुण खिलारी, किरण तारडे, सचिन जाधव, भाऊसाहेब करपे, विजय शिंदे, मयूर धुमाळ, सौरभ भांबळ, प्रियंका पांढरे, ज्योती शेळके, शितल फाटक, सुजाता तारडे, सुनीता ढोकणे, अनिता म्हसे, मोहिनी पेरणे, रोहिणी हापसे, सुरेखा मकासरे, सोनाली कुमावत, अनिता लांबे, दुर्गा बारवेकर व लिपिक भाग्यश्री झांबरे, शिपाई शारदा तमनर आदींसह बहुसंख्य पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.



# क्रीडा महोत्सव व बुद्धिबळ स्पर्धा

नांदेड जिल्हाः (समर्थ गांवकरी)

स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठात विद्यापीठ येथे सुरू असलेल्या २७ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवामध्ये बुद्धिबळ या क्रीडा प्रकारामध्ये राज्यातील २० विद्यापीठांनी सहभाग घेतलेला आहे. यामध्ये ८० मुले आणि ८० मुली असे एकूण १६० खेळाडू बुद्धिबळ खेळत आहेत. यामध्ये स्विस लीग पद्धतीने सहा स्पर्धा होणार आहेत. प्रत्येक सामना हा तीन तासांचा आहे. दोन फेरी अखेर मुलं आणि मुलींमध्ये पुणे विद्यापीठ पुढे आहे.

या खेळामध्ये ३६ मुले आणि २५ मुली या आंतरराष्ट्रीय फिडे मानांकित खेळाडूंनी सहभाग घेतलेला आहे. मिहीर सरवडे हा विद्यार्थी २१३७ आंतरराष्ट्रीय फिडे नामांकित विद्यार्थ्याचाही या खेळामध्ये सहभाग आहे. जळगाव येथील आंतरराष्ट्रीय पंच प्रवीण ठाकरे ही मुख्य पंचाची भूमिका बजावत आहेत. त्यांचे सहकारी पंच म्हणून डॉ. दिनकर हंबर्डे, प्रशांत सूर्यवंशी, श्रीकांत मंत्री, गगनदीपसिंघ, सुचिता हंबर्डे हे काम पाहत आहेत. उमन कँडिडेट मास्टर म्हणून संस्कृती वानखेडे आणि तनिषा बोरामणीकर काम पाहत आहेत.

# आमदारांना १ वर्षात पडला मतदार संघातील कार्यकर्त्याचा विसर

नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)



शिवसेना शिंदे गटाचे नांदेड दक्षिणचे आमदार आनंद पाटील बोंढारकर यांना अवघ्या एक वर्षातच मतदार संघातील कार्यकर्त्याचा विसर पडल्याचे दिसून येत आहे पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी आमदारांच्या नांदेड दक्षीण विधानसभेच्या निवडणुकी वेळी जो कार्यकर्ते जीवाचे रान करून दिवस रात्र एक करून दिवस रात्र न बघता उघडपणे सर्वांना विरोध करून प्रचार करून मतदारांना हात जोडून विनंती करून आमच्या उमेदवाराला निवडून द्या अशी विनवणी करणारे कार्यकर्ते मात्र एकाच वर्षात आमदारांनी त्या कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडल्याचे दिसते कारण का कोणत्याही कार्यकर्त्याचा आमदार महोदय फोन उचलत नाहीत किंवा त्यांच्या फोनला किती वेळा कॉल केला तर त्यांचे त्या फोन करणाऱ्या सर्व सामान्य कार्यकर्ता यांना काहीच उत्तर नसतो त्यांच्यासह काही गावातील सरपंच लोकप्रतिनिधी यांचा ही आमदार महोदय फोन उचलत नसतात व त्यांना काहीच प्रतिसाद देत नसतात त्यामुळे येत्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीमध्ये आमदारांना कळेल पदाधिकारी कार्यकर्ते काय असतात .

कारण कार्यकर्ता हा कार्यकर्ताच असतो कोणत्याही गुत्तेदाराला जवळ घेतल्यास गुत्तेदार त्या गावांमध्ये जाऊन मतदान करून देणारे नसतात ज्या त्या गावांमध्ये त्याच गावातील कार्यकर्त्यांनाच मतदान साठी प्रयत्न करून मते मिळवून द्यावे लागतात मात्र आशा कार्यकर्ता यांना संभाळण्यासाठी व पक्ष वाढवण्यासाठी त्यांना पण काही छोटे मोठे कामे देऊन त्यांना सोबत घेऊन चालावा लागतो मात्र हि बाब आमदार महोदयांनी लक्षात घ्यावी अन्यथा आजपर्यंत नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघात आशाच वागण्या च्या पद्धतीने एक वेळा निवडून आलेल्या आमदारांना नांदेड दक्षिण विधान सभा मतदार संघातील बहाद्दर मतदारांनी दुसऱ्यांदा संधी दिली नाही त्यासाठी आजवर झालेल्या आमदारा प्रमाणेच हाल होईल हेच पाहावे लागेले ? मात्र या पूर्वी चे कॉग्रेस पक्षा चे आमदार सर्व सामान्यां साठी झगडणारा आमदार शेतकरी पुत्र म्हणून त्यांची ओळख होती त्यांना कुणीही आर्धा रात्री फोन केल्यास त्या फोन ला प्रतिसाद देऊन त्यांची आडचण सोडवणूक करून सर्व सामान्या च्या हाकेला वो देणारा आमदार म्हणून नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघचे च नाही तर ते पुर्ण जिल्ह्यात नाव लैकिक झाले होते मात्र सध्याचे आमदार महोदय पदाधिकारी कार्यकर्ते यांचा च फोन उचलत नाहीत तर इतरांचे काय ? कार्यकर्ते यांचा वापर फक्त आणि फक्त निवडणुकीच्या वेळी मतदाना साठी व नारे देऊन पुढे पुढे करुण खुर्ची व सतरंज्या उचण्यासाठी केला जातो का ? तर हे चुकीचे आहे कार्यकर्ता च्या बळावर कार्यकर्ता यांनी जीवाचे रान करून तुमचा निवडणूक प्रचार करून तुम्हास निवडून आणले हे आमदारांनी एक वर्षातच पदाधिकारी कार्यकर्त्यांना विसरल्याचे दिसून येत आहे कारण पक्षाचेच शिवसेनेतील अनेक पदाधिकारी कार्यकर्ते आमदार यांच्या वागण्यावर नाराज असल्याचे दिसून येत आहे या सर्व बाबी लक्षात घेऊन आमदार महोदयांनी वेळीच आपल्या वागण्यात बदल करावे अन्यथा येत्या जिल्हा परिषद पंचायत समितीला त्यांना कळेलच कार्यकर्ता काय असतो कार्यकर्ते किती ताकद असते हे अवघ्या काही दिवसात त्यांना कळेल कार्यकर्ता आहे तर नेता आहे अन्यथा

नेत्याला कोणी विचारत नाही हे पण लक्षात असावे कारण शिवसेना पक्षाचे मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ भाई शिंदे यांनी आपल्या भाषणात अनेक वेळा सांगतात की आपण निवडून येते ते कार्यकर्ते याच्या बळावर मात्र कार्यकर्ते याचे वेळेवर फोन उचला कार्यकर्ते यांची आडचण जाणून घ्या त्यांच्या आडचणी च्या वेळी त्यांना खंबीर पणे साथ द्या त्यांच्या पाठीशी उभे राहा कार्यकर्ते नाराज होता कामा नाही असे अनेक वेळा सांगीतले जाते मात्र त्यांच्या आदेशाचे बोलण्याचे इतरांनी बोध घ्यावा म्हणजे कार्यकर्ते नेत्यांच्या सोबत राहतील.

# शेतकरी भरत जाधव यांच्या " जुन्नर गोल्ड " आंब्याला मिळाले पेटेन्ट

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

वैष्णवधाम ता.जुन्नर , जि.पुणे येथील प्रगतीशील शेतकरी भरत जाधव यांनी विकसित केलेल्या "जुन्नर गोल्ड" या आंब्याच्या नवीन वाणाला आज लखनऊ विद्यापीठामार्फत पेटेन्ट मिळाल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी गणेश भोसले यांनी दिली यावेळी अधिकारी व मान्यवरांच्या शुभहस्ते त्यांचा सत्कारही करण्यात आला महाराष्ट्र शासन - कृषी विभाग व कृषी विज्ञान केंद्र नारायणगाव यांच्या मार्फत दिल्ली येथून लखनऊ विद्यापीठा कडे प्रोटेक्शन ऑफ प्लांट व्हरायटी अँड



फार्मसी राईट्स अथॉरिटी कडे हा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्यांनतर शास्त्रज्ञ डॉ रवि प्रकाश, डॉ विनीत सिंग यांनी प्रत्यक्ष पाहणी करून झाडाची पाने व फळे यांचे नमुने तपासल्या नंतर सर्व निकशांची पूर्तता झाल्यानंतर आज या वाणाला अधिकृत मान्यता मिळाली असून त्याचे पेटेन्ट मिळाले आहे.यासाठी त्यांना रफीक नायकोडी संचालक विस्तार व प्रशिक्षण ,विनय आवटे संचालक नियोजन कृषी आयुक्तालय,पुणे दत्तात्रय गवसाने विभागीय कृषी सहसंचालक ,पुणे,संजय काचोळे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी पुणे,कृषिरत्न अनिलतात्या मेहेर,कृषिभूषण जितेंद्र बिडवई, सतीश शिरसाट उपविभागीय कृषी अधिकारी खेड,गणेश भोसले तालुका कृषी अधिकारी जुन्नर, प्रशांत शेटे प्रमुख शस्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र, नारायणगाव, भरत टेमकर शास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र नारायणगाव,बापू रोकडे कृषी अधिकारी,प्रतीक्षा धायगुडे मंडळ कृषी अधिकारी, भाऊसाहेब बोकड,गणेश धाडवड,अनिता वाघुले,भारती मडके यांचे मोलाचे सहकार्य लाभले . या वाणाची वैशिष्ट्ये :- नियमित फाळधारणा होते, फळांचे वजन ८०० ते ९०० ग्रामपर्यंत आहे. ,फळांचा रंग बाहेरून पिवळा व आतून केशरी आहे,चव हापूस,केशर व राजपुरी मिश्रित असून अन्य वैशिष्ट्ये ही अहवालत नमूद केलेली आहेत. भरत जाधव या प्रयोगशील शेतकऱ्याच्या संशोधनबाबत परिसरातून त्यांचे कौतुक होत आहे .



जुन्नर तालुका : तीर्थ क्षेत्र आदर्श गाव मौजे बस्ती ता:-जुन्नर येथे दत्त जयंती सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.सालाबाद प्रमाणे यावर्षी देखील दत्त जयंती सोहळ्या निमित्ताने महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांच्या उपस्थितीमध्ये सोहळा संपन्न झाला दत्त जन्म सोहळा हरिभक्त परायण पांडुरंग महाराज घुले (अध्यक्ष गाथा मंदिर देहू )यांच्या हरी कीर्तनाने संपन्न झाला.

## थोडक्यात बातम्या...



### फुलवळच्या शेतकरी स्वयंसहाय्यता गटाचे जलसंधारणात योगदान

कंधार (स. गांवकरी) : कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली फुलवळ येथील शेतकरी स्वयंसहाय्यता गटाने जलसंधारणाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. गटाचे अध्यक्ष आणि सर्व सदस्यांनी मिळून गावातील चोपन मधील नाल्यावर वनराई बंधारा यशस्वीरित्या उभारला आहे. या उपक्रमासाठी फुलवळच्या कृषी सहाय्यक रंजना केद्रे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी गटातील सदस्यांना वनराई बंधाऱ्याचे पर्यावरणीय आणि कृषी क्षेत्रातील महत्त्व सविस्तरपणे समजावून सांगितले. या बंधाऱ्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होईल, ज्यामुळे शेतीसाठी पाण्याचा स्रोत उपलब्ध राहील आणि भूजल पातळी सुधारण्यास हातभार लागेल. शेतकरी स्वयंसहाय्यता गटाचा हा उपक्रम इतरांसाठी एक उत्कृष्ट उदाहरण ठरला आहे, जो पाणी वाचवण्याचा आणि त्याचा योग्य वापर करण्याचा संदेश देतो.




### आशियातील सर्वात मोठे मेटल फॉर्मिंग टेक्नॉलॉजी प्रदर्शन बेंगळुरूमध्ये

मुंबई (स. गांवकरी) : मेटल फॉर्मिंग आणि उत्पादन तंत्रज्ञान क्षेत्रातील आशियातील सर्वात मोठे औद्योगिक प्रदर्शन — IMTEX FORMING 2026 — येत्या 21 ते 25 जानेवारी 2026 दरम्यान बेंगळुरू आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र (BIEC) येथे पार पडणार आहे. इंडियन मशीन टूल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (IMTMA) तर्फे आयोजित या प्रदर्शनात जगभरातील अग्रगण्य उद्योग गट एकाच व्यासपीठावर दाखल होणार आहेत. या भव्य प्रदर्शनात 4 हॉलमध्ये 46,000 चौरस मीटर क्षेत्रफळात 20 देशांतील 600 हून अधिक प्रदर्शक अत्याधुनिक तंत्रज्ञानाची झलक सादर करतील. ऑटोमोबाईल, एरोस्पेस, वैद्यकीय उपकरणे, संरक्षण, रेल्वे, बांधकाम उपकरणे, इलेक्ट्रॉनिक्स, भांडवली वस्तू आणि अवजड अभियांत्रिकी अशा विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ प्रतिनिधी आणि उद्योगातील निर्णयकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती अपेक्षित आहे.




### १९ दिव्यांग लाभार्थींना अर्थसहाय्य; मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान

■ ग्रामपंचायत मटाने येथे दिव्यांग दिन साजरा

देवळा (स. गांवकरी) : मटाने (ता. देवळा) येथील ग्रामपंचायत कार्यालयात दिनांक ३ डिसें. रोजी जागतिक दिव्यांग दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी गावातील दिव्यांग बांधवांचा यथोचित सन्मान व आर्थिक मदत करण्यात आली. ग्रामपंचायतीच्या स्वतःनिधीतून ५ टक्के दिव्यांग लाभार्थी योजनेअंतर्गत एकूण १९ दिव्यांग लाभार्थींना ६७० रुपये प्रत्येकी याप्रमाणे एकूण १२,७३० रुपयांचे अनुदान थेट त्यांच्या खात्यावर (खानदेश वाटप) करण्यात आले. या उपक्रमामुळे दिव्यांग बांधवांमध्ये समाधानाचे वातावरण दिसून आले. तसेच गावातील दिव्यांग लाभार्थींना दिव्यांगत्व ओळखपत्रांचे वाटप देखील यावेळी करण्यात आले. यामुळे दिव्यांग व्यक्तींना विविध शासकीय योजनांचा लाभ घेणे सोपे होणार आहे. या कार्यक्रमाला लोकनियुक्त थेट सरपंच मोहन पवार उपस्थित होते. ग्रामपंचायत अधिकारी देविका ठाकरे सह ग्रामपंचायत सर्व सदस्य, प्रतिष्ठित नागरिक, उद्योजक के.के. आहेर, पंचायत समितीचे माजी सभापती राहुल केदारे, कैलास राजाराम आहेर यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ व दिव्यांग बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दिव्यांग लाभार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. ग्रामपंचायतीने राबविलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून सामाजिक बांधिलकी जोपासणारा उपक्रम म्हणून मटाने ग्रामपंचायतीचे विशेष अभिनंदन करण्यात येत आहे.

दिव्यांग बांधव हे समाजाचे अविभाज्य घटक असून त्यांना सक्षम बनविणे ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे. ग्रामपंचायत स्तरावरून दिव्यांगांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी आम्ही अधिकारी आणि लोकप्रतिनिधी कटिबद्ध आहोत.

- ग्रामपंचायत अधिकारी - देविका ठाकरे

# पवार गुरुस्वामी यांच्या पुढाकारातून आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

लायन्स नेत्रालय नांदेड आणि श्री साईबाबा श्री नर्मदेश्वर महादेव मंदिर संस्थान, किनवट यांच्या संयुक्त विद्यमाने नि:शुल्क नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, दंत तपासणी व श्रवणदोष (कान) तपासणी शिबिराचे आयोजन किनवट येथील ओमसाई कल्याण मडपम येथे करण्यात आले.

या शिबिरात एकूण ७५ जणांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २९ रुग्णांमध्ये मोतीबिंदू असल्याचे निदान करण्यात आले. या रुग्णांना नांदेड येथील लायन्स नेत्रालयात



उपचारासाठी विशेष वाहनाने नेण्यात आले असून तेथे त्यांची नि:शुल्क मोतीबिंदू शस्त्रक्रिया करून पुन्हा किनवट येथे परत आणले जाणार आहेत. शिबिराची सुरुवात शिबिरार्थ्यांच्या हस्ते श्री साईबाबा व श्री नर्मदेश्वर महादेवांची पूजा-अर्चना करून करण्यात आली.

शिबिरात खालील तज्ञांनी तपासण्या केल्या : नेत्रतज्ज्ञ डॉ. नागेश कदम – नेत्र तपासणी - काजल तायडे – बीपी व शुगर तपासणी, दंततज्ज्ञ डॉ. बालाजी धर्मकारे – १५ जणांची दंत तपासणी, श्रवणदोष तज्ञ डॉ. सुधांशु काले – १४ जणांची कान तपासणी

या नि:शुल्क शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मंदिर संस्थानचे सच्चिदानंद पवार गुरु स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच लायन्स क्लब, किनवटचे माजी अध्यक्ष के. मूर्ती अण्णा यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. यावेळी अमित पुजारी महाराज, अशोक गाडेकर (नांदेड), गणेश झलके आदी मान्यवर उपस्थित होते. मंदिर संस्थानतर्फे शिबिरात सहभागी झालेल्या सर्व शिबिरार्थ्यांसाठी भोजन व्यवस्था करण्यात आली होती.

गेल्या अनेक वर्षांपासून प्रत्येक महिन्याच्या पहिल्या गुरुवारी हे नि:शुल्क नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर सातत्याने आयोजित केले जात आहे. पुढील शिबिर गुरुवार, ४ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात येणार असून गरजू नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## एकदिवसीय जिल्हा परिषद ठाणे येथे संवेदनशीलता कार्यशाळा

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ (RPWD Act 2016) कलम ३९ अंतर्गत दिव्यांग व्यक्तींबाबत संवेदनशीलता व जागरूकता निर्माण करण्यासाठी ठाणे जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार एकदिवसीय कार्यशाळेचे आज, दि.५ डिसेंबर, २०२५ रोजी बी. जे. हायस्कूल, कोर्ट नाका, ठाणे येथे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन अप्पर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्ह्यातील सर्व विभाग विविध शासकीय विभागांतील अधिकारी उपस्थित होते. कार्यशाळेचे प्रास्ताविक उज्वला सपकाळे यांनी करत दिव्यांग व्यक्तींच्या अधिकारांविषयी जागरूकता वाढविण्याचे महत्व अधोरेखित केले. राष्ट्रीय न्यास ( National Trust Act) कायदा याविषयावर दीपिका शेरखाने दिव्यांग विभागप्रमुख यशवंतराव चव्हाण सेंटर यांनी मार्गदर्शन केले. विनित भागोजी प्रकल्प व्यवस्थापक व त्यांच्या सहकारी खुशी गणोत्रा नॅशनल सेंटर फॉर प्रमोशन ऑफ एम्प्लॉयमेंट फॉर डिसॅबल पिपल यांनी RPWD Act 2016 व कलम ३९ बाबत सविस्तर माहिती या विषयावर, सामाजिक कार्यकर्त्या दिव्यांगांसाठी उपलब्ध सुविधा, प्रत्यक्ष अनुभवावरील चर्चासत्र यांनी उत्कृष्ट मार्गदर्शन केले.

## महिलांना कृषी कौशल्य विकास प्रशिक्षण

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रीय स्थायी विकास संस्था (NISD) इंडिगो एअर लाईन्स व अफार्म पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ११ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२५ दरम्यान जुन्नर तालुक्यातील उंब्रज, खामुंडी,पिंपरी-पेंढार,डुंबरवाडी आणि ठिकेकरवाडी येथील ग्रामसंघातील महिला कृषी उत्पादक गट यांना पीक काढणी पश्चात तंत्रज्ञान शेती माल प्रक्रिया प्रशिक्षण यामध्ये पीक काढणी नंतर पिकाची कशी काळजी घ्यावी वअल्पखर्चीक कृषी तंत्रज्ञान क्षमता बांधणी या संदर्भात प्रशिक्षण संस्था अध्यक्ष डॉ.प्रकाश पाळंदे,स्मिता पवार, अभिजित मदने यांच्या मार्गदर्शनानुसार देण्यात आले.



या प्रशिक्षण कार्यक्रम प्रसंगी प्रशिक्षक रविंद्र भोर यांनी मार्गदर्शन केले की कोणतेही पीक उत्तम प्रकारे पिकविण्या साठी योग्य शेती तंत्रज्ञान वापरावे लागते तालुक्यात खास करून सोयाबीन आणि कांदा ही पिके आर्थिक लाभ देणारी मानली जातात यामध्ये कांदा पिकाचे साठवण व्यवस्थापन करण्या साठी,कांदे प्रथम ४ ते ५ दिवस सावलीत सुकवावेत, त्यानंतर थंड, कोरड्या,हवेशीर आणि अंधाऱ्या जागी साठवावेत साठवणुकीच्या जागेत हवा खेळती राहणे आवश्यक आहे.

अल्पखर्चीक कृषी तंत्रज्ञान क्षमता बांधणी मध्ये अल्पखर्चीक कृषी तंत्रज्ञान क्षमता बांधणी प्रशिक्षणात,प्रशिक्षकांनी शेतकऱ्यांना कमी खर्चात अधिकउत्पादन घेण्यास मदत करणाऱ्या पद्धती,जसे की जलसंधारण, सेंद्रिय शेती,कमी खर्चाचे तंत्रज्ञान मातीचे आरोग्य व नवीन तंत्रज्ञानाचा योग्य वापर कसा करावा यासोबतच आधुनिक तंत्रज्ञान जसे की ड्रोनचा वापर व हवामाना तील बदलांना तोंड देण्यासाठीच्या उपायांबद्दल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला ठिकेकरवाडीचे सरपंच संतोष ठिकेकर,डुंबरवाडीच्या सरपंच शितल डुंबरे, ग्रामधिकारी कोल्हे भाऊसाहेब,सीआरपी रोहिणी ठिकेकर,अर्चना शिंगोटे,शितल डुंबरे,शिल्पा हांडे,उज्वला देवगिरे यांच्या उपस्थितीत पार पडले.

## श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्यात यावी

### जिल्हा तैलिक महासभेची मागणी


**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र शासनाने डिसेंबर २०१८ साली काढलेल्या परिपत्रकानुसार राष्ट्रपुरुष,थोर व्यक्ती यांच्या जयंती व राष्ट्रीय दिन साजरे करणे. या कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, (शासन परिपत्रक क्र.ज.पु.ति. २२१८/प्र.क्र.१९५/२९ दि.२६/१२/२०१८) संदर्भानुसार श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती सोमवारी ८ डिसेंबर रोजी साजरी करण्याचा आदेश काढण्यात आला आहे.त्याचे पालन व्हावे.त्यानुसार ८ डिसेंबर सोमवारी नगर जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयात श्री संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्यात यावी.

असे आवाहन महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे नाशिक विभागीय कार्याध्यक्ष हरिभाऊ डोळसे यांनी केले आहे. शासनाच्या व निमशासकीय कार्यालय तसेच शैक्षणिक संस्था श्री संत संतांजी महाराजांची जयंती साजरी करण्यासाठी आधिकृत फोटोंचा वापर करण्यात यावा.अशी विनंती करण्यात आली आहे.

फोटो फ्रेम मिळण्यासाठी श्री संताजी फ्रेम वर्क, परसराम सैंदर, शिंपीगल्ली, तेलीखुंट, नगर.श्री दत्त फ्रेमिंग वर्क्स, बाळासाहेब देशपांडे दवाखान्यासमोर, नगर.

ओंकार सुपर स्टोअर्स, महाजनगल्ली, नगर किंवा अधिक माहितीसाठी हरिभाऊ डोळसे (मो. ९८२२२७१८०७) यांच्याशी संपर्क साधावा.



## श्रीगोंदा कन्या विद्यालयात जागतिक दिव्यांग दिन उत्साहात साजरा

**श्रीगोंदा: (समर्थ गांवकरी)**

श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालय, श्रीगोंदा तसेच पंचायत समिती शिक्षण विभाग, श्रीगोंदा यांच्या संयुक्त विद्यमानाने जागतिक दिव्यांग दिन विविध उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समिती शिक्षण विभागाच्या गटशिक्षणाधिकारी मा. कुसुमकुमारी कानडी या उपस्थित होत्या. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य मा. कुंडलिकराव दरेकर, मा. सौ. जोत्स्ना भंडारी, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघटनेचे तालुकाध्यक्ष मा. पीटर रनसिंग, प्रहार दिव्यांग संघटनेचे तालुकाध्यक्ष श्री. सुरेश गलांडे, सचिव श्री. सुधीर भालेराव, शहराध्यक्ष सचिव श्री. तोडकर, शिक्षण विभागाचे विस्तार अधिकारी श्री. निळकंठ बोरुडे, केंद्रप्रमुख श्री. माणिकराव आढाव, उपमुख्याध्यापिका सौ. निलीमा कातोरे, श्री. बापूराव औटी, श्री. राजेंद्र बारगुजे आदी मान्यवर उपस्थित होते.

# काम करत आलोय.. काम करत राहील : आमदार काशिनाथ दाते सर

**नगर : (समर्थ गांवकरी)**

गुरुवार दि. ४ डिसेंबर २०२५ गेल्या चाळीस वर्ष राजकारणात, समाजकारणात काम करत असताना कुठल्याही प्रकारच्या गटातटाचा विचार न करता सामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवूनच मी काम करत आलो असून तो माझा पिंड आहे, उद्याच्या काळातही आपण त्याच पद्धतीने काम करत राहणार असल्याचे स्पष्ट मत खातगाव टाकळी ता.नगर येथे तिर्थक्षेत्र विकास योजना सन २०२५-२६ अंतर्गत २५ लक्ष रुपये प्रशासकीय मंजुरी असलेल्या गोरक्षनाथ मंदिर सभामंडपाच्या भूमिपूजन प्रसंगी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सरांनी व्यक्त केले.




यावेळी माजी जि. प. सदस्य अरुणराव होळकर, अकोळनेर सरपंच प्रतिक शेळके, हमिदपुर सरपंच छबुराव कांडेकर, उद्योजक दिलीपशेठ दाते, जखणगाव सरपंच डॉ सुनिल गंधे, सुनिल नरवडे, बापू सोनवणे, श्रीकांत कर्डिले, भाऊसाहेब सातपुते सर, अतुल कार्ले, विलासराव कळसकर, दिलीपराव होळकर, उपसरपंच धीरज कुलट, आदिनाथ कुलट गुरुजी, सर्जेराव जपे गुरुजी आदी मान्यवरांसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले की,"सर्वांगीण विकास हा सर्व समाजघटकांना सोबत घेऊन साधला जातो. प्रत्येक नागरिकाच्या सहभागाशिवाय विकास शक्य नाही आणि ह्या विचारांना प्रमाण मानणारा मी एक कार्यकर्ता आहे. पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील जनतेने मला गेल्या निवडणुकीत सेवा करण्याची संधी दिली. त्या संधीचं सोन करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व माजी खासदार सुजय विखे पाटील यांसह महायुती सरकारच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने मी सातत्याने प्रयत्नशील आहे आणि यात मी कुठेही कमी पडलो नाही व पुढेही पडणार नाही."

"मी गट-तटाच्या राजकारणात कधीच पडलो नाही. जो कोण सामाजिक काम घेऊन माझ्याकडे येईल, त्याचे काम मार्गी लावण्याची जबाबदारी मी मानतो. वैयक्तिक टीका-टिप्पणी, आरोप-प्रत्यारोप, झुंडशाही किंवा गुंडशाही हे माझ्या स्वभावात नाही.

त्यामुळे समाजहितापेक्षा स्वार्थ आणि विकासापेक्षा संघर्ष शोधणाऱ्यांना माझं शांत आणि विकासाभिमुख राजकारण डोळ्यात खुपतं," असेही आमदार दाते सर यावेळी म्हणाले.

काम करणारी नेतृत्व म्हणुन गेली विस वर्ष मी राजकारणात विखे कुटुंबावर विश्वास ठेवून काम करत आलो असून तालुका स्तरावर माझा निर्णय वेगळा असायचा परंतु आता आमदार दातेसरांच्या माध्यमातून मतदारसंघातील विकासकामांचा सुरु असलेला वेग पाहून एक कामाचा माणूस म्हणुन यापुढील काळात पक्षविरहित राजकीय व सामाजिक वाटचालीत आमदार दातेसरांच्याच सोबत राहणार आहे.

- अरुणराव होळकर माजी जि.प.सदस्य

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# महिला शिक्षकाकडून विद्यार्थ्यांना धर्मांतराचे धडे

- नगर शहरातील शिक्षण संस्थेतील प्रकार
- पोलीस अधीक्षकांना दिले निवेदन



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शहरातील एका खासगी शिक्षण संस्थेतील महिला शिक्षिकाकडून विद्यार्थ्यांना धर्मांतराबाबतचे धडे देत असून, तिचे इंटरनॅशनल कॉल उघडकीस आले असून, त्या महिलेवर फिर्याद दाखल झाली आहे. येत्या पाच दिवसांमध्ये कडक कारवाई करून अटक न केल्यास तीव्र स्वरूपाचा मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा आमदार संग्राम जगताप यांनी दिला.

लहान मुलांच्या मनावर धर्मांतराबाबत शिकवले जाते, हा गंभीर प्रकार असून पालकांनी पुढे येऊन अशा प्रवृत्तीच्या लोकांवर गुन्हे दाखल करावे, त्यांना धडा शिकवण्याचे काम आपण करू, असा इशारा देत हा प्रकार गंभीर असून यात लक्ष घालावे, अशी मागणी आमदार संग्राम जगताप यांनी पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन केली.

यावेळी माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, सुरेश बनसोडे, दत्ता खैरे, विशाल पवार, डॉ. राहुल मुथा, अनंत शेळके, रमेश गांधी, अमोल देडगावकर, मेहुल शहा, परेश लोढा, दिनेश चोपडा, ओंकार घोलप आदी उपस्थित होते.

जादूटोण्यासारखा प्रकार करून लव जिहादमध्ये अडकवण्याचा प्रकार समोर आलेला आहे. मुलगी घरी एकुलती एक आहे, असे समजल्यावर रॅपर नसलेले चॉकलेट तिला खायला दिले. त्यानंतर मुलीला २३ दिवसानंतर उलट्या झाल्या, गुंगी आली आणि त्याच्या दुसऱ्या दिवशीपासून मुलगी शिक्षिकेकडे धर्माची माहिती घ्यायला लागली.

मला नमाज शिकवा, अशी मागणी त्या शिक्षिकेकडे करायला लागली. यानंतर शिक्षिकेने मुलीला इंस्टाग्रामचा आयडी ओपन करून दिला. तांबोळी नावाच्या मुलाशी ओळख करून दिली.तुमचे बहिण -भावाचे नाते आहे, असे मुलीला सांगून त्यांच्यात नातेसंबंध बनवून दिले. काही दिवसानंतर जवळीक करून संबंध बनवून तिच्याशी रिलेशनशिपमध्ये आला. इतक्यावरच न थांबता या मुलाने इतर २५ अल्पवयीन मुलांशी संबंध जुळवून दिले. तिच्या इंस्टाग्रामला ते जोडून दिलेले आहेत. काळी जादू, वशीकरण प्रकारामध्ये या मुलीस २ अत्तराच्या बाटल्या एक घरात ठेवण्यासाठी व एक सोबत ठेवण्यासाठी देण्यात आल्या. गोळ्या खायला दिल्या, एक चावी देण्यात आली. दोन काळे बॉल, २ नाणे देवून तिला तिच्या वडिलांच्या तिजोरीत ते ठेवण्यास सांगितले. एक माळ, दोन अंगठ्या, गोंडा लावलेला एक पेन दिला. काळी जादू करून या गोष्टी तिला दिल्या गेल्या. हा प्रकार पालकांना कळल्यानंतर त्यांनी तो प्रकार समाजापुढे आणला. हा अतिशय गंभीर प्रकार असून, याबाबत शाळेतील शिक्षक व तिला सहकार्य करणाऱ्या इतर शिक्षकांची सखोल चौकशी करण्यात यावी यासाठी अजून किती मुलींना या प्रकारामध्ये अडकवलेले आहे तसेच हे करण्यामागे अजून कोणकोणत्या व्यक्तींचा सहभाग आहे , हे रॅकेट उघडकीस आणून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

# पोलीस खाते व विद्यार्थी समुदेशन व्हावे

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये पोलीस खाते व विद्यार्थी समुदेशन व्हावे यासाठी पारनेर चे पोलीस निरीक्षक संतोष खेडकर साहेब यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांनी स्वभाविक जीवना मध्ये कशा प्रकारे यश प्राप्त करावे या विषयी सांगितले. खेडकर साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की विद्यार्थ्यांनी मोबाईल पासून सावध राहावे मोबाईलचा अतिवापर टाळावा तसेच मेसेज फॉरवर्ड करताना विचारपूर्वक करावे . येत्या आगामी काळामध्ये तुम्ही विद्यार्थी देशाचे भविष्य असून तुमच्याकडून खूप आशा आहेत. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी सर यांच्या हस्ते पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांचा सत्कार करण्यात आला यावेळी जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे कौन्सिलिंग सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी , महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे डिजिटल मीडिया जिल्हाध्यक्ष विनोद गायकवाड, पोलीस स्टेशनचे कर्मचारी पोलीस कॉन्स्टेबल पोपट मोकाते यांच्यासह ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मल्हारी वागसकर सर,विजय सोबले सर ,नारायण शेळके सर, अतुल सैद सर,सोबल सर,हिंगडे सर, नितीन ढोकळे,निलेश जासूद सर,रवींद्र मते सर,सुशांत खेडकर ,सोनल रोहोकले,श्रीमती नीलम खिलारी मॅडम, सुनील झावरे सर,वैशाली गायके,सुरेखा ठाणग यांच्यासह सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.




विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना कोणत्याही प्रकारचा त्रास जर कोणी देत असेल तर त्यांनी त्यांची तक्रार पारनेर पोलीस स्टेशन तसेच हेल्पलाइन नंबर 112 तसेच आपली तक्रार विद्यालयातील तक्रार पेटीमध्ये टाकावी तक्रार देणाऱ्या विद्यार्थिनीचे नाव हे गुप्त राहील.

**- संतोष खेडकर पोलीस निरीक्षक पारनेर.**

# गांजीभोईरे येथे दत्त जयंती उत्साहात साजरी

- ह भ प विजयमहाराज खाडे यांची कीर्तनसेवा

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

औदुंबर निवासी,दत्त साक्षात्कारी बाल तपस्वी गागरे महाराजांच्या पवित्र उपस्थितीत आणि भाविक भक्तांच्या मोठ्या उपस्थिती मधे पारनेर तालुक्यातील गांजीभोयरे येथील श्री दत्त आश्रमामध्ये सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री गुरुदत्त जयंती सोहळा मोठया भक्तीभावाने व उत्साहात साजरा झाला. सकाळपासून विविध कार्यक्रम झाले. त्यामध्ये सकाळी ६.०० तें ७.०० श्री दत्त महापूजा,सकाळी ७.०० ते ८.०० होमहवन, सकाळी ८.०० ते १०.०० सामुदायिक भजन,सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत ह.भ.प. विजय महाराज खाडे यांचे हरीकीर्तन झाले. दुपारी १२.३० ते १.०० महाआरती झाली, दुपारी १.०० ते ३.०० महाप्रसाद आयोजित केला होता यावेळी किर्तन समयी बोलताना, ह.भ.प. विजय महाराज खाडे यांच्या प्रभावी कीर्तनामुळे दत्तगुरूंचा भक्तीमय महिमा अनुभवण्याची सुवर्णसंधी भाविकभक्तांना चालून आली होती.दत्त उत्सव सोहळ्याची सोहळ्यामध्ये पारंपरिक दत्तमहाराज आरती, पूजा,अभिषेक, भजन,संकीर्तन व दत्तमय भक्ती संतवाणी व अध्यात्मिक मार्गदर्शन झाले.



दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥ संपूर्ण विश्वाला आचरणात आणि मर्यादा सापेक्ष ज्ञानाने परिपूर्ण सनातन धर्माचे संस्कार भगवान श्रीदत्तात्रय महाराज यांच्या जन्माने अखंड भारत देशाला मिळालेले वरदान आहे.देश कायद्याने तर, धर्म संस्कृतीने परिपूर्ण होत असतो म्हणून संपूर्ण भारत देशात श्री दत्त यांचा जन्मोउत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावेळी, हरीनाम किर्तन जुन्नर तालुक्यातील हभप विजय महाराज खाडे यांनी,

धरी अवतार विश्व तारावया । अत्रीची अनुसूया गरोदर ॥ या अभंगावर निरूपण करताना भगवंत अवतार घेण्याचे कारण काय,देव कोणाच्या पोटी जन्माला येतो, या अनुषंगाने सती अनुसूयाच्या पतिव्रतेच महात्म्य सांगून समाजाला भगवंत भक्तीचे महत्वाच प्रतिपादन केले.

# सहकारी संस्थांच्या निवडणुकीला ब्रेक

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे सहकाराच्या आखाड्यातील द्वंद पुन्हा थंडावले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होईपर्यंत निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने याविषयीचे शासकीय परिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे.राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने यापूर्वी घेतला होता. राज्यात ऑगस्ट महिन्यात पावसानं मोठं थैमान घातलं होतं. अतिवृष्टीमुळे आणि मुसळधार पावसामुळे राज्यातील २० हून अधिक जिल्हे प्रभावित झाले होते. त्यामुळे सहकारी संस्थांच्या निवडणुकांना ब्रेक लागला होता.

# टीईटी सक्ती रद्द करावी! जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक व माध्यमिक शिक्षक संघटनेच्या वतीने टीईटी सक्ती, जुनी पेन्शन, रिक्त पदभरती आदी दीर्घकालीन प्रलंबित मागण्यांसंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. शासनाने शिक्षकांवर लादलेली टीईटी सक्ती रद्द करावी, प्रलंबित प्रश्नांवर तात्काळ निर्णय घ्यावा अशी मागणी करण्यात आली.

या प्रमुख मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले यावेळी आमदार सत्यजित तांबे, शिक्षक नेते प्रवीण ठुबे, रावसाहेब रोहोखले, संजय कळमकर, आबासाहेब जगताप, संजय धामणे, सुनील पंडित, महेश ठीगे, दिनेश खोसे, संतोष सरोदे, राम कदम, बाबासाहेब बोडखे, अमित पोहाळे, सिताराम सावंत, तौसीफ सय्यद, विजय देठे, आप्पासाहेब जगताप, जयश्री झरेकर, आप्पासाहेब शिंदे तसेच जिल्ह्यातील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शिक्षक संघटनेने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सर्वोच्च न्यायालयाच्या टीईटी अनिवार्यतेवरील निर्णयावर पुनर्विचार याचिका दाखल करण्यात शासनाकडून होत असलेला विलंब चिंताजनक असून त्यामुळे राज्यातील शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. शिक्षण विभागाने टीईटी निकालाचा चुकीचा अर्थ काढून सुरू केलेल्या कारवाया तात्काळ थांबवाव्यात. जुनी पेन्शन योजना (OPS) पुन्हा लागू करावी. शिक्षण सेवक योजना रद्द करून नियमित वेतनश्रेणी लागू करावी. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी १०-२०-३० वर्षांनंतरची सुधारित वेतन-प्रगती योजना लागू करावी. १५ मार्च २०२४ चा संच मान्यता विषयक शासन निर्णय रद्द करावा.

राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची बंद असलेली भरती सुरू करावी, तसेच सर्व रिक्त पदे १००% भरण्यात यावीत. शिक्षकांवर लादलेली अशैक्षणिक व ऑनलाईन कामे तत्काळ थांबवावीत. विषय पदवीधर शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी कोणताही भेदभाव न करता मंजूर करावी. वस्ती शाळेतील शिक्षकांना नियुक्ती तारखेपासून सर्व सेवा लाभ लागू करावेत. आश्रमशाळांतील कंत्राटी भरतीचे धोरण रद्द करावे. अल्पसंख्याक शाळांना स्वमान्यता व नियुक्ती मान्यतेसाठी विशेष सवलत द्यावी. कमी पटाच्या शाळा न बंद करता शिक्षक क्रम सुरू ठेवावा. शिक्षकांच्या मागण्या अनेक वर्ष प्रलंबित राहिल्यामुळे राज्यातील शिक्षकांमध्ये असंतोष वाढत चालला असून, शासनाने तातडीने सकारात्मक दृष्टीकोनातून निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. मागण्या न मानल्यास राज्यभर शाळा बंद ठेवून मोठ्या आंदोलनाची चेतावणी संघटनेकडून करण्यात आली.

# हर्ष धाडगे याने राष्ट्रीय बुध्दीबळ स्पर्धेत पटकावले ब्रॉंझ पदक

- हर्ष धाडगेच्या नेत्रदीपक कामगिरीने सारडा महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर - प्रा. शिरीष मोडक



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

सारडा महाविद्यालय चा हर्ष धाडगे (११वी सायन्स )याने त्रिपुरा येथे झालेल्या ५७ वी शालेय राष्ट्रीय बुद्धीबळ चॅंपियनशिप स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी करीत यश संपादन करून शालेय राष्ट्रीय बुद्धीबळ स्पर्धेत तीसरा क्रमांक मिळवून पेमराज सारडा महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली आहे.हर्ष ने राष्ट्रीय शालेय स्पर्धेतही चांगली कामगिरी करून तिसरा क्रमांक मिळवला होता.असे प्रतिपादन हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक यांनी केले आहे.

त्रिपुरा येथे झालेल्या राष्ट्रीय बुद्धीबळ स्पर्धेत पेमराज सारडा कॉलेज चा हर्ष धाडगे (११वी सायन्स)या विद्यार्थ्यांने पाच (सामने)स्पर्धा खेळून हर्ष धाडगे ने रॅंकिंग मध्ये येऊन तीसरा क्रमांक मिळवून ब्रांझ पदक मिळविले. या यशाबद्दल हिंद सेवा मंडळाचे वतीने हर्ष धाडगे चा सत्कार हिंद सेवा मंडळ चे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी वरीष्ठ महाविद्यालयचे चेअरमन डॉ रमेश झरकर,मानद सचिव संजय जोशी,ज्युनिअर कॉलेज चेअरमन डॉ पारस कोठारी,जेष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा, अजीत बोरा, अँड फडणीस, सुमतीलाल कोठारी, प्राचार्या डॉ माहेश्वरी गावित, प्रबंधक अशोक असेरी, उपप्राचार्य गिरीश पाखरे, सुपरवायझर डॉ.कुमावत, डॉ.रिकल,एम आर कुलकर्णी सर्वांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.हर्ष धाडगे याला प्रा.संजय धोपावकर,प्रा. संजय साठे (क्रीडा संचालक ) यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.

याप्रसंगी सारडा महाविद्यालयाचे जुनिअर कॉलेजचे चेअरमन डॉ.पारस कोठारी म्हणाले, सारडा महाविद्यालयातील खेळाडूंना नेहमीच प्रोत्साहित केले जाते.विद्यार्थ्यांचा खेळात सहभाग असावा.

तसेच विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये यश संपादन करावे यासाठी हिंद सेवा मंडळाचे सर्व पदाधिकाऱ्यांचे सहकार्य मिळत असते.हर्ष घाडगे यांने राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत ब्रांझ पदक मिळवून चमकदार कामगिरी केली ही सारडा महाविद्यालयासाठी अभिमानास्पद बाब आहे.

# नृत्यांगनाची हॉटेल मधे आत्महत्या

**जामखेड तालुका : (समर्थ गांवकरी)**

जामखेड शहरातील तपनेश्वर भागात मैत्रीणींन सोबत रहाणारी नृत्यांगना दिपाली गोकुळ पाटील हीने खर्डा रोड वरील एका हॉटेलच्या लॉजमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली. नृत्यांगना हीने आत्महत्या का केली याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. याप्रकरणी जामखेड पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की मयत नृत्यांगना दिपाली गोकुळ पाटील, वय 35 वर्षे रा. तपनेश्वर गल्ली. (मुळ रा. कल्याण, जिल्हा. ठाणे) ही जामखेड येथील एका कलाकेंद्रात नृत्यांगना म्हणून काम करीत होती. सध्या ती आपल्या इतर मैत्रीणी सोबत तपनेश्वर भागात भाड्याने रुम करुन रहात होती. आज गुरुवार दि 4 डिसेंबर रोजी सकाळी आपल्या रुम मधिल मैत्रीणींना मी बाजारात जाऊन येते असे दिपाली हीने सांगितले.

# कॉंग्रेस, राष्ट्रवादीला खात्री : भाजपलाही आशा

- "पालिकेवर आमचीच सत्ता", कंधारमध्ये दावे प्रतिदावे

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रवादीचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर व कॉंग्रेसचे नेते माजी नगराध्यक्ष अरविंद नळगे यांची निवडणुकीत प्रतिष्ठापणाला लागली होती. उभय नेत्यांची धूर्त व मुत्सद्दी राजकारणी म्हणून ओळख आहे. डावपेचात ही ते पारंगत आहेत. त्यांनी पालिका ताब्यात घेण्यासाठी उत्कृष्ठ व परिणामकारक अशी मोर्चेबांधणी केली होती. यामुळे पालिकेवर कॉंग्रेसची सत्ता येणार की राष्ट्रवादीची याबाबत वेगवेगळे अंदाज व्यक्त केले हात आहेत.

नगरपरिषद निवडणूकीची मतदान प्रक्रिया संपताच विविध पक्षांचे नेते, उमेदवार व कार्यकर्ते आकडेमोड करून पालिकेवर आमचीच सत्ता येणार असा निष्कर्ष काढत आहेत. अत्यंत चुरशीच्या झालेल्या निवडणुकीतील कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस ( अजित पवार) पक्षाला विजयाची खात्री आहे तर भाजपकडूनही विजयाची अंधुक अशी आशा व्यक्त केली जात आहे. पालिकेवर कुणाची सत्ता येणार ? कोण नगराध्यक्ष होणार ? हे ईव्हीएम मशीन मध्ये कैद झाले असून विजयाबाबत मात्र विविध पक्षांकडून दावे प्रतिदावे केले जात आहेत.

२०१६ च्या डिसेंबर मध्ये पालिकेची निवडणूक झाली होती. त्यानंतर डिसेंबर २०२५ मध्ये पालिकेची निवडणूक झाली. ९ वर्षानंतर निवडणूक झाल्याने नेते, कार्यकर्ते आणि जनतेमध्ये उत्साह दिसून आला. कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कडून साम दाम दंड भेद याचा मोठ्याप्रमाणात अवलंब करण्यात आला. निवडणुकीत अक्षरशः पैशांचा महापूर दिसून आला." अब नहीं तो कभी नहीं" या उक्ती प्रमाणे विविध पक्षाच्या अध्यक्ष व नगरसेवकपदांच्या उमेदवारांनी विजयासाठी सर्व शक्ती पणाला लावल्याचे दिसून आले. यामुळे साडेपाच नंतरही मतदानासाठी विविध केंद्रावर मतदारांच्या रांगा लागलेल्या दिसून आल्या.

कट्टर राजकीय वैरी असलेल्या आमदार प्रताप पाटील चिखलीकर व कॉंग्रेसचे नेते अरविंद नळगे यांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. प्रचार दरम्यान त्यांच्यात आरोप प्रती आरोपाच्या फैरी झाडल्या गेल्या. चिखलीकरांनी राष्ट्रवादी सत्तेत असल्याने पालिका ताब्यात देण्याचे आवाहन केले तर नळगे यांनी चिखलीकर यांच्यावर टीका करीत शहराच्या सर्वांगीण विकासाची हमी देत कॉंग्रेसला विजयी करण्याचे आवाहन केले.

# संरक्षक भिंत बांधकाम उद्घाटन सोहळा संपन्न

**अकोले: (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील मौजे औरंगपूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या संरक्षक भिंत बांधकामाचे नुकतेच उद्घाटन करण्यात आले. ग्रामपंचायत आणि शालेय समितीच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच सौ. स्वाती वाळुंज, उपसरपंच संदेश वाळुंज, तसेच ग्रामपंचायत सदस्य यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी माजी सरपंच मोहनराव वाळुंज, मल्टीस्टेट पतसंस्थेचे व्हा. चेअरमन नवनाथ वाळुंज, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन भास्कर वाळुंज, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष विकास पाचपुते, सोसायटीचे संचालक बाळासाहेब वाळुंज, अगस्ती सहकारी कारखाना युनियन सदस्य अमोल वाळुंज, ग्रामपंचायत सदस्य प्रकाश पाचपुते, मुख्याध्यापक संजय भोर , नेटके सर, ओंकारेश्वर देवस्थान उपाध्यक्ष राजेंद्र वाळुंज, ओंकारेश्वर देवस्थान विश्वस्त विठ्ठल वाळुंज, तसेच ओंकारेश्वर देवस्थान विश्वस्त अण्णा वाळुंज, किरण वाळुंज, रमा वाळुंज, बाबू वाळुंज, अरुण पाचपुते, रवींद्र वाळुंज, गणेश वाळुंज आदी मान्यवर उपस्थित होते. ग्रामस्थांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती,उद्घाटन प्रसंगी उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढवून तसेच गुलाल-पुष्पांचा उपयोग करून संरक्षक भिंतीच्या बांधकामाचे विधिवत उद्घाटन करण्यात आले. शाळेच्या सुरक्षिततेसाठी व परिसराच्या सुशोभीकरणासाठी ही भिंत अत्यंत आवश्यक असून ग्रामपंचायत व शालेय व्यवस्थापन समितीने घेतलेल्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.

# विहीर बुजवली; डॉ. बाबासाहेबांच्या पाऊलखुणा पुसण्याचा प्रयत्न?

## विहीर खुली करण्याची पत्रकार मिलिंद जाधव यांची मागणी

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

भिवंडी तालुक्यातील पडघे गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या ऐतिहासिक पाणी सत्याग्रहाची साक्ष देणारी १०० वर्षे जुनी सर्वे नं. ७९/१० मधील सतीची विहीर बुजवण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उजेडात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त या घटनेवर स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून या संदर्भात पत्रकार मिलिंद जाधव यांनी मुंबई, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, ठाणे जिल्हाधिकारी, भिवंडी प्रांताधिकारी, तहसीलदार, मंडळ अधिकारी आणि तलाठी यांच्याकडे लेखी निवेदन देऊन कारवाईची मागणी केली आहे.

पडघा ग्रामपंचायत हद्दीतील सर्वे नं. ७९/१० मधील सतीची विहीर जवळपास १०० वर्ष जुनी असून त्याच सतीच्या विहिरीवरती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाणी सत्याग्रह केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पडघे ,समतानगर येथे काशिनाथ हाशाबा दोंदे यांच्या घरी उतरले होते. याच काळात सतीची विहीर निवडून येथे सत्याग्रहींसह पाणी काढण्यात आले होते. या घटनेचा उल्लेख 'ठाणे संघसरिता' या पुस्तकात स्पष्टपणे करण्यात आला आहे.

आम्ही लहान होतो, तेव्हा डॉ.बाबासाहेब पडघ्यात आले होते. सतीच्या विहिरीवर त्यांनी पाणी सत्याग्रह केला. एका शिसवीच्या झाडाखाली त्यांची मोठी सभा झाली होती. 'मुलांना शिक्षण द्या' असा संदेश त्यांनी आम्हाला दिला होता.समतानगर मधील काशिनाथ दोंदे यांच्या घरी उतरले होते. तर चहा पाणी घेतला होता. अशी आठवण समतानगर येथील हिराबाई दुंदांजी सोनावणे (वय ९५) यांनी सांगितली.





सतीची विहीर वाचवण्यासाठी गेल्या २० वर्षांपासून लढा देत असून,पडघा ग्रामपंचायतीला वारंवार तक्रारी करूनही काहीच कारवाई होत नाही .अनेक अधिकाऱ्यांच्या संगनमताने या जागेत व्यवहार करण्यात आल्याची शंका आहे.असा गंभीर आरोप पडघा येथिल जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते शरद साने (वय ७९) यांनी केला आहे.

या संदर्भात पडघा मंडळ अधिकारी संतोष आगविले यांच्याशी संपर्क साधला असता या सतीच्या विहिरी बद्दल यापूर्वीही २०१९ मध्ये चौकशी करून वरिष्ठ अधिकाऱ्यांना अहवाल सादर केला . तसेच दोन दिवसांपूर्वीच पुन्हा माझ्याकडे तक्रार अर्ज आला असून त्या अर्जावर मंगळवारी सुनावणी घेऊन पुढील चौकशी करणार असल्याचेही सांगितले.

डॉ. बाबासाहेबांनी पदस्पर्श केलेली ही विहीर आमच्या पडघ्याचा अभिमान आहे. "डॉ. बाबासाहेबांच्या पाऊलखुणा पुसू देणार नाही" इतिहास पुसण्याचा कोणताही प्रयत्न आम्ही सहन करणार नाही.

विहीर पुन्हा उघडी करण्यासाठी माझा लढा कायम राहील.असे पत्रकार मिलिंद जाधव यांनी बोलतांना सांगितले.

शासन ही घटना गांभीर्याने घेणार का? ही ऐतिहासिक विहीर पुन्हा उघडली जाणार का? की डॉ. बाबासाहेबांच्या पडघ्याशी निगडित अमूल्य पाऊलखुणा कायमच्या पुसल्या जाणार? या प्रश्नांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नवीन टी20 विश्वचषक 2026 जर्सींचे अनावरण

(समर्थ गांवकरी)

भारतीय क्रिकेट टीमचे अधिकृत किट प्रायोजक असलेल्या Adidas ने भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (BCCI) भागीदारीत रायपूर येथील शहीद वीर नारायण सिंह आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममध्ये टीम इंडियाच्या टी20 विश्वचषक 2026 च्या नवीन जर्सींचे अनावरण केले. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यादरम्यान या जर्सींचे पहिल्यांदा अनावरण करण्यात आले, ज्यामुळे भारतीय क्रिकेटचा उत्सव साजरा करण्यासाठी संपूर्ण स्टेडियम जिवंत झाला.




Adidas आणि BCCI ने या जर्सींचे अनावरण करण्याचा उद्देश चाहत्यांना खेळाच्या जवळ आणणे आणि ही जर्सी खेळाडू, चाहते आणि देश यांच्यातील एकतेचे एक शक्तिशाली प्रतीक बनवणे हा होता.

नवीन जर्सीमध्ये बोल्ड, रेट्रो डिझाइन आणि आधुनिक, उच्च-कार्यक्षमता असलेल्या सिल्हूटचा मेळ आहे. 1990 च्या स्ट्राइप्ड इंडिया जर्सीपासून प्रेरित होऊन, किटमध्ये रेट्रो ट्विस्टसह आधुनिक नमुने आहेत. 2024 च्या टी20 विश्वचषक विजेत्या जर्सीची नेकलाइन कायम ठेवण्यात आली आहे. उष्ण हवामानासाठी, त्यात बॉडी-मॅप केलेले, 3डी-इंजिनिअर्ड मेकॅनिकल स्ट्रेच फॅब्रिक्स आहेत ज्यात Adidas चे नवीनतम क्लायमाकूल+ मटेरियल आहे, जे वेगाने घाम काढून टाकते आणि खेळाडूंना जास्त काळ कोरडे ठेवते. श्वासोच्छवासासाठी तीन छिद्रित स्ट्राइप टेप प्रदान केले आहेत. फॅब्रिकवर जाळीदार छिद्रे प्रदान केली आहेत आणि खराब हवामानातही इष्टतम वायुवीजनासाठी ट्रिम्स आहेत.

Adidas इंडियाचे जीएम विजय चौहान म्हणाले, "आमच्या क्रिकेटपटूंना जागतिक दर्जाचे कामगिरीचे साहित्य पुरवण्यासाठी Adidas वचनबद्ध आहे. प्रत्येक जर्सी ती घालणाऱ्या खेळाडू किंवा चाहत्याची कहाणी सांगते. प्रत्येक जर्सी एका वारशाचे प्रतिनिधित्व करते. भारतीय क्रिकेट चाहत्यांसाठी ही जर्सी अनावरण करण्यासाठी BCCIसोबत भागीदारी करताना आम्हाला आनंद होत आहे. आगामी स्पर्धांमध्ये, विशेषतः विश्वचषकात संपूर्ण देश अभिमानाने ही जर्सी घालताना पाहण्यास आम्ही उत्सुक आहोत."

भारतीय क्रिकेटपटू आणि Adidas खेळाडू रोहित शर्मा म्हणाला, "क्रिकेट चाहत्या म्हणून जयजयकार करण्यापासून ते माझ्या देशासाठी ट्रॉफी घरी आणण्यापर्यंत, माझे संपूर्ण आयुष्य खेळाच्या आठवणींनी भरलेले आहे. मी एका नवीन युगात प्रवेश करत असताना, मला अजूनही तोच अभिमान वाटतो.

टीम इंडियाची ही नवीन जर्सी आपल्याला आठवण करून देते की आपण स्टँडमध्ये असो किंवा मैदानावर, आपण सर्वजण एकाच रंगाचे कपडे घालतो आणि भारतासाठी एकाच स्वप्नावर विश्वास ठेवतो."

ही जर्सी भारतात निवडक Adidas स्टोअर्समध्ये आणि adidas.co.in वर उपलब्ध असेल. किंमती ₹999 पासून सुरू होतात.

# सायली पवार यांची रिपब्लिकन पक्षाच्या महिला आघाडीच्या शहर सरचिटणीस पदी नियुक्ती

पुणे : (समर्थ गांवकरी)

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या पुणे शहर महिला आघाडीच्या शहर सरचिटणीस पदी सायली विजय पवार यांची नियुक्ती शहराध्यक्ष हिमाली कांबळे यांच्या हस्ते करण्यात आली.

सायली पवार यांना त्यांच्या नियुक्तीचे पत्र पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी पक्षाचे पुणे शहर अध्यक्ष संजय सोनवणे, प्रभारी शैलेंद्र चव्हाण, बाळासाहेब जानराव, परशुराम वाडेकर, असित गांगुर्डे, अशोक कांबळे , महेंद्र कांबळे, महिपाल वाघमारे, श्याम सदाफुले इत्यादी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.



सायली पवार या गेल्या दहा वर्षापासून सामाजिक क्षेत्रात काम करीत आहेत. शहरातील विविध झोपडपट्ट्यांमध्ये नागरी सुविधांचे प्रश्न, शालेय साहित्य वाटप, महिला बचत गट, तरुणांना रोजगार मिळवून देणे अशा विविध कार्य त्यांनी केले आहे. त्या पदवीधर असून महिलांना सक्षम करण्यासाठी त्यांचे मोठे योगदान आहे त्यांच्या निवडीमुळे शिवाजीनगर मतदार संघामध्ये उत्साहाचे वातावरण आहे रिपब्लिकन पक्षाच्या वाढीसाठी त्यांचा निश्चित उपयोग होईल असा विश्वास पुणे शहर महिला अध्यक्ष हिमाली कांबळे यांनी व्यक्त केला.

# राष्ट्रीय स्तरावर 'इसुझू आय-केअर विंटर कॅम्प'ची घोषणा




चेन्नई : (समर्थ गांवकरी)

सर्वोत्तम सेवा आणि मालकीचा अनुभव देण्याच्या इसुझू'च्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार करण्याच्या निरंतर प्रयत्नात, इसुझू मोटर्स इंडिया आपल्या इसुझू डी-मॅक्स पिक-अप्स आणि एसयूव्हीच्या श्रेणीसाठी देशव्यापी 'इसुझू आय-केअर विंटर कॅम्प' आयोजित करणार आहे. या सेवा शिबिराचा उद्देश ग्राहकांना देशभरातील हंगामात त्रास-मुक्त वाहन चालविण्याच्या अनुभवासाठी रोमांचक लाभ आणि प्रतिबंधात्मक देखभाल तपासणी उपलब्ध करून देणे हा आहे. 'इसुझू केअर'च्या पुढाकाराने, दिनांक 8 ते 13 डिसेंबर 2025 (दोन्ही दिवस समाविष्ट) दरम्यान सर्व इसुझू अधिकृत विक्रेता सेवा केंद्रांवर विंटर कॅम्पचे आयोजन केले जाईल.

या कालावधीत, ग्राहक त्यांच्या वाहनांसाठी विशेष ऑफर आणि लाभ देखील मिळवू शकतात. आग्रा, अहिल्यानगर, अहमदाबाद, अंबिकापूर, बारामुल्ला, बरेली, बारमेर, भरुच, भटिंडा, बेंगळुरू, भोपाळ, भुवनेश्वर, बिकानेर, बिलासपूर, कालिकत, छत्रपती संभाजी नगर, चेन्नई, चिक्कमंगळूरू, कोईम्बतूर, दिल्ली, दिब्रुगड, दिमापूर, दुर्गापूर, एर्नाकुलम, गांधीधाम, गुरुग्राम, गुवाहाटी, हावडा, हुबळ्ळी, हैदराबाद, इंदूर (2), जयगाव, जयपूर, जालंधर, जम्मू, जोधपूर, कडप्पा, कलबुर्गी, करनाल, खम्मम, कोल्हापूर, कोलकाता, कोट्टायम, कुरनूल, लातूर, एलबी नगर (हैदराबाद), लेह, लखनऊ, लुधियाना, मदुराई, मंडी, मेहसाणा, मोहाली, मुंबई, (नेरूळ, बोरिवली), मुंद्रा, म्हैसूर, नागपूर, नाशिक, नेल्लोर, निजामाबाद, नोएडा, पाटणा, पुणे, रायपूर, राजमुंद्री, राजकोट, रत्नागिरी, सातारा, शिवमोग्गा, सीकर, सिलीगुडी, सोलापूर, सुरत, थेनी, त्रिसुर, तिरुनेलवेली, तिरुपती, त्रिची, तिरुवनंतपुरम, वडोदरा, विजयवाडा आणि विशाखापट्टणम येथे असलेल्या इसुझू'च्या सर्व अधिकृत सेवा सुविधांवर विंटर कॅम्प आयोजित करण्यात येईल.

# कोटक म्युच्युअल फंड वार्षिक आउटलुक २०२६

मुंबई : (समर्थ गांवकरी)

आगामी वर्षात शेअरबाजाराची वाटचाल कशी राहील, याबाबत अंदाज व्यक्त करणारा मार्केट आउटलुक २०२६ हा अहवाल कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड ("केएमएएमसी"/"कोटक म्युच्युअल फंड") ने आज प्रसिध्द केला. या अहवालात आगामी वर्षात भारताच्या वित्तीय बाजारपेठांना आकार देणारे ढोबळ आर्थिक वातावरण तसेच गुंतवणूकीच्या कोणत्या प्रमुख संकल्पना अग्रभागी राहतील, याबाबतचा व्यापक दृष्टिकोन सादर करण्यात आलेला आहे. या अहवालात समभाग, स्थिर उत्पन्न योजना आणि विविध क्षेत्रातील संकल्पना या आधारे निर्माण होणाऱ्या विविध संधींकडे लक्ष वेधण्यात आलेले आहे.

# स्टिंग एनर्जी आणि मर्सिडीज : कारसोबत भागीदारीची घोषणा

मुंबई : (समर्थ गांवकरी)

पेप्सिकोचे सळसळती ऊर्जा देणारे एनर्जी ड्रिंक आणि फॉर्म्युला १® चे अधिकृत टीम पार्टनर स्टिंग एनर्जी मर्सिडीज-एएमजी पेट्रोनास एफ१ टीमसोबत भागीदारी करत असून त्यांनी यशाच्या एका नवीन टप्प्यात प्रवेश केला आहे. फॉर्म्युला १ आणि ब्रँड भागीदारी अशा दोन्हीसाठी ही पहिलीच अशी घटना असून स्टिंग एनर्जी आणि मर्सिडीज-एएमजी पेट्रोनास एफ१ टीमने कारमार्फत डिजिटल फिल्मद्वारे बातम्या पोहोचवण्याची परवानगी दिली. पोडियम नाही. स्क्रिप्ट नाही. फक्त एक अचूक-ट्यून केलेला लॅप जिथे इंजिन "स्टिंगगगगगग" अशी जोरदार गर्जना करते. या घोषणेत केवळ भागीदारीचीच नाही तर तर स्टिंग वीकेंड्सना असलेल्या शर्यतींमध्ये काय




आणेल याचीही जोरदार घोषणा आहे. त्यात आहे अधिक ऊर्जा, अधिक वेग आणि चाहते आणि मर्सिडीज-एएमजी पेट्रोनास एफ१ टीम यांच्यातील प्रिय संबंध. व्हिडिओ प्रदर्शित झाल्यानंतर लगेचच आघाडीच्या क्रिएटर्सनी सोशल मीडियावर या बातम्यांबद्दल आणि कारच्या माध्यमातून तिचा कसा प्रसार केला याबद्दल आपल्या प्रतिक्रिया अत्यंत उत्साहाने व्यक्त केल्या. "ही भागीदारी कामगिरी, ऊर्जा आणि चव एकाच बॅनरखाली एकत्र आणेल आणि पेप्सिकोच्या तीन सर्वात प्रतिष्ठित ब्रँडना जगातील सर्वात यशस्वी फॉर्म्युला १ टीमशी जोडेल," पेप्सिकोचे इंटरनॅशनल बेव्हरेजेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी यूजीन विलेमसेन म्हणाले. "गेटोरेड, स्टिंग आणि डोरिटोसच्या माध्यमातून आम्ही खेळाच्या संस्कृतीत आहोत आणि खेळाडू व चाहते दोघांनाही एफ१ च्या थ्रिलसाठी सज्ज करत आहोत. मर्सिडीज-एएमजी पेट्रोनास फॉर्म्युला १ टीमसोबत भागीदारी कामगिरी, नावीन्य आणि उत्कृष्टता या दोन्ही कंपन्यांचे केंद्रबिंदू असलेल्या मूल्यांबाबत आमची वचनबद्धता अधोरेखित करते."

मर्सिडीज-एएमजी पेट्रोनास एफ१ टीमचे टीम प्रिन्सिपल आणि मुख्य कार्यकारी अधिकारी टोटो वोल्फ म्हणाले: "पेप्सिकोसारख्या मजबूत पोर्टफोलिओ असलेल्या कंपनीचे आमच्या भागीदारी वर्तुळात आगमन हे आमच्या टीम आणि आमच्या खेळाच्या ताकदीचे आणखी एक लक्षण आहे. एक ब्रँड म्हणून ते नावीन्यपूर्णता आणि उत्कृष्टता आणून अंतिम ध्येयाचा पाठपुरावा करण्याच्या आमच्या नीतिमत्तेशी पूर्णपणे जुळतात. क्रीडा विज्ञानातील गॅटोरेडचे ज्ञान, स्टिंगची तरुण ऊर्जा आणि डोरिटोसची सांस्कृतिक प्रासंगिकता दर वेळी काहीतरी अद्वितीय आणते. ते एकत्र येऊन अशी भागीदारी तयार करतात जी केवळ आमच्या टीमच्या कामगिरीला पाठबळ देत नाही तर जगभरातील आमच्या चाहत्यांचा अनुभव समृद्ध करते."

# 'लग्नपंचमी'च्या निमित्ताने अमृता प्रथमच रंगभूमीवर

मुंबई : (समर्थ गांवकरी)

मराठी रंगभूमीवरची दोन सर्जनशील, संवेदनशील आणि बहुमुखी कलावंत मधुगंधा कुलकर्णी आणि निपुण धर्माधिकारी प्रथमच एकत्र येत 'लग्नपंचमी' हे नवीन नाटक नवीन वर्षाच्या सुरुवातीला रंगभूमीवर घेवून येत असल्याने रसिकांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. ही उत्सुकता आता आणखी वाढणार आहे, कारण मराठी-हिंदी चित्रपटसृष्टी व टेलिव्हिजन, ओटीटी या क्षेत्रांमधील आघाडीची अभिनेत्री अमृता खानविलकर या नाटकात मध्यवर्ती भूमिकेत सूर्यजाच्या व्यक्तिरेखेत दिसणार आहे. म्हणजेच 'चंद्रमुखी' आता 'सूर्यजा'च्या भूमिकेत दिसणार आहे. या नाटकाच्या माध्यमातून ती नाट्यसृष्टीत पदार्पण करत आहे. मराठी चित्रपटसृष्टीच्या या 'चन्द्रमुखी'ने आत्तापर्यंत मराठी नाटक केलेले नाही. तिचे हे पदार्पण मराठी रंगभूमीवरील दोन प्रतिभावान



आणि दिग्गज नाट्यकर्मींबरोबर होत आहे. त्यांच्याबरोबर तेवढ्याच ताकदीची अभिनेत्री म्हणून ओळख असलेली अमृता प्रमुख भूमिकेत लाभल्याने या नाटकाला एक वेगळेच ग्लॅमर प्राप्त होणार आहे. 'लग्नपंचमी' हा लग्नातील विरोधाभास, भावना, विनोद आणि नात्यांचा बहुरंगी प्रवास अत्यंत मनमोकळ्या पद्धतीने मांडणारा नवीन मराठी प्रयोग नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. त्यातील नायक कोण हा प्रश्न अजूनही अनुत्तरीत असला तरी या नाटकाची नायिका मात्र ठरली आहे. अमृताच्या चाहत्या वर्गाला या नाटकाची उत्सुकता नक्कीच लागून राहणार आहे.

साडेमाडे तीन, गैर, नटरंग, शाळा, झकास, अर्जुन, कट्यार काळजात घुसली, ...आणि डॉ काशिनाथ घाणेकर, चन्द्रमुखी यांसारखे मराठी, मुंबई साल्सा, हिम्मतवाला, कॉन्ट्रॅक्ट, राझी, बाकी इतिहास यांसारखे हिंदी चित्रपट अमृताच्या नावावर आहेत. गेल्या वीस वर्षांच्या कारकिर्दीत तिने साधारण पन्नास चित्रपट केले आहेत. त्याशिवाय टाइम बॉम्ब, एकापेक्षा एक, झलक दिखला जा, जिवलगा यांसारख्या हिंदी-मराठी टेलीव्हीजन मालिकाही तिने केल्या आहेत. लुटेरे, ३६ डेज, फेमसली फिल्मफेअर मराठी, डॅमेजड् यांसारख्या ओटीटी मालिका तिच्या नावावर आहेत.

अमृताने आतापर्यंत मराठी रंगभूमीवर काम का केले नव्हते आणि हे नाटक करायचे तिने का ठरवले, याबद्दल बोलताना, ती म्हणते, "मी नाटकात काम करेन असे माझ्या कधी मनातही आले नव्हते. शिवाय मला काही चांगली, आकर्षक संधीही आतापर्यंत मिळाली नव्हती.

कोणत्याही नाटकासाठी मोठ्या प्रमाणावर तयारी आणि कटीबद्धता लागते. मोठ्या प्रमाणावर सराव लागतो आणि विविध शहरांमधील प्रयोग कित्येक महिने करावे लागतात. मला ते करणे कठीण वाटत होते." 'लग्नपंचमी' बद्दल बोलताना ती म्हणाली की नाटकाचा विषय आणि या नाटकाची टीम यांच्यामुळे या नाटकाकडे मी आकर्षित झाले. "एलिझाबेथ एकादशी, वाळवी यांसाख्या चित्रपटांची लेखिका मधुगंधा कुलकर्णी यांनी माझा विचार या नाटकासाठी केला हीच माझ्यासाठी मोठी गोष्ट होती.

# शहरातील सर्वात मोठी पिकलबॉल स्पर्धा

पुणे : (समर्थ गांवकरी)

शहरामध्ये 4 ते 7 डिसेंबरपर्यंत पुणे ओपन 2025 चे आयोजन करण्यात आले आहे, जी पुण्यातील पहिली व सर्वात मोठी पिकलबॉल स्पर्धा आणि फेस्टिवल आहे. #WPBLOnTour ने पुणे युनायटेडसोबत सहयोगाने अत्याधुनिक अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटी येथे या स्पर्धेचे आयोजन केले आहे. स्पर्धात्मक क्रीडा, मनोरंजन, खाद्यपदार्थ व संस्कृतीचा उत्साहवर्धक आनंद देत चार दिवस आयोजित करण्यात आलेली ही चॅम्पियनशीप उच्च-स्तरीय स्पर्धा, उच्च दर्जाचे परफॉर्मन्स आणि समुदायांच्या उत्स्फूर्त सहभागाची खात्री देते. 15 लाख रूपये बक्षीसासह पुणे ओपन 2025 भारतभरातील ॲथलीट्स, चाहते आणि पिकलबॉलप्रेमींचे लक्ष वेधून घेईल.

# एचपी लेसर एम३०० : उत्पादकतेला पाठबळ

मुंबई : (समर्थ गांवकरी)

भारतातील लघु व्यवसाय आणि नोकरदार वर्ग वाढत असताना प्रिंटिंग हा दैनंदिन कामाचा एक आवश्यक भाग राहिला आहे. मोठ्या महानगरांपासून ते भारतातील टियर-२ आणि टियर-३ शहरांपर्यंत छोटे व्यवसाय आणि स्थानिक प्रिंट दुकाने आपल्या कामाच्या व्यवस्थापनासाठी वेगवान, वापरण्यास सुलभ प्रिंटरवर अवलंबून असतात. एचपीची लेसर एम३०० मालिका विशेषतः या गरजा पूर्ण करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. त्यात वेगवान प्रिंटिंग, ऑटो डुप्लेक्स वैशिष्ट्ये, मोबाइल प्रिंटिंग आणि कमी खर्च यांचा समावेश आहे.



प्रिंटिंगची स्थानिक दुकाने आणि नोकरदार लोक अनेकदा मोठ्या प्रमाणात अर्ज, कायदेशीर फाइल्स, पुस्तिका आणि अहवाल हाताळतात. या परिस्थितीत जलद प्रिंटिंग आणि सातत्यपूर्ण गुणवत्ता महत्त्वाची आहे. एचपी लेसर एम३०० सिरीज ३० पीपीएमपर्यंत (ए४) प्रिंट करते, १५ आयपीएमपर्यंत डुप्लेक्स प्रिंटिंग शक्य करते आणि सुमारे ८.५ सेकंदांत पहिले पान प्रिंट करून देते. सर्व मॉडेल्समध्ये ऑटो डुप्लेक्स प्रिंटिंग वेळ वाचवते आणि कागदाचा वापर कमी करण्यास मदत करते. बहुउद्देशीय ट्रे कामाच्या वेळेत कामे जलद पूर्ण करून देतो. एचपी ॲपद्वारे मोबाइल प्रिंटिंगसह येणारे ग्राहक आणि ऑफिस टीम हे दोघेही आपल्या स्मार्टफोनवरून थेट प्रिंट करू शकतात. टोनर पुरवठा संपूर्ण भारतात सहज उपलब्ध आहे, त्यामुळे प्रिंटिंगमध्ये कुठेही विलंब होत नाही. लघु उद्योगांना अशा प्रिंटरची आवश्यकता असते जे देखभालीसाठी सोपे असतात आणि कोणत्याही अडथळ्याविना रोजचे काम हाताळू शकतात. एचपी लेसर एम३०० मालिकेत भरपूर -उत्पन्न देणारे एचपी १८९ए/एक्स टोनर कार्ट्रिज आहेत जे १५०० ते ३००० पाने प्रिंट करतात. त्यामुळे त्यांना वारंवार बदलण्याची गरज पडत नाही. बहुउद्देशीय ट्रेसह २५०-शीट इनपुट ट्रे सतत प्रिंटिंग शक्य करतो. प्रिंटर ३०,००० पानांपर्यंतच्या ड्युटी सायकलसह, ऑफिसमधील नेहमीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी तयार केलेले आहेत. यूएसबी किंवा वायरलेस पर्यायांमुळे सोपे सेटअप आणि एचपी ॲप वापरकर्त्यांना सहजपणे प्रिंट, स्कॅन आणि कॉपी करणे शक्य होते.

# Vivo X300 मालिका लॉंच; परफॉर्मन्समध्ये एक नवीन आयाम




नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)

Vivo India ने आज त्यांचे नवीनतम फ्लॅगशिप स्मार्टफोन, Vivo X300 आणि X300 Pro लॉंच करण्याची घोषणा केली. Vivo ने Zeiss च्या सहकार्याने विकसित केलेल्या इमेजिंग उत्कृष्टता आणि डिझाइन नवोपक्रमाचा वारसा पुढे चालू ठेवला. X300 मालिकेत व्यावसायिक दर्जाचा Zeiss ऑप्टिक्स, नवीन, बुद्धिमान Origin OS 6 आउट-ऑफ-द-बॉक्स, वाढीव उत्पादकता आणि AI वैशिष्ट्ये आणि MediaTek Dimensity 9500 द्वारे समर्थित फ्लॅगशिप कामगिरी आहे. भारतात काळजीपूर्वक तयार केलेली आणि उत्पादित केलेली ही मालिका प्रीमियम डिझाइन, प्रगत इमेजिंग तंत्रज्ञान आणि अंतर्ज्ञानी वापरकर्ता अनुभव देण्यावर Vivo चे सतत लक्ष केंद्रित करते हे प्रतिबिंबित करते.

# रांधे येथे भक्तीचा महापूर : भव्य महाआरती व महाप्रसाद

## श्री स्वामी समर्थ मंदिरात महाआरती आणि महाप्रसाद

पारनेर तालुका : (समर्थ गांवकरी)

गुरुवार दिनांक 27 नोव्हेंबर 2025 रोजी रांधे येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात आयोजित महाआरती आणि महाप्रसादाचा कार्यक्रम अत्यंत भक्तिभावाने, शिस्तिमधे आणि आध्यात्मिक उर्जेने संपन्न झाला. प्रत्येक गुरुवारी होत असलेला हा सोहळा आता हजारो भाविकांसाठी श्रद्धेचा आधार आणि आध्यात्मिक शक्तीचा स्रोत बनला आहे.

भक्तिभावाने भारलेला संध्याकाळचा क्रम 7.45 ते 8.15 सामूहिक स्वामी नामजप, 8.35 – भव्य व भक्तिसमाधीरूप महाआरती,महाआरतीनंतर स्वामी महती व मार्गदर्शन आणि शेवटी महाप्रसाद सेवा.

महाप्रसाद सेवा सेवेकरी बाबा पडवळ, विठ्ठल मावळे, पिनू मावळे, प्रभाकर खैरे, प्रशांत खैरे,अक्षय खैरे,सागर पडवळ,राहुल लाळगे, हरिभाऊ कापसे, देवराज शेंडकर, स्वप्निल मावळे, राहुल बा लाळगे, मनोज लोणकर, यश पोखरकर, अविनाश लाळगे, आकाश लाळगे, दीपक मावळे,डॉ. सुभाष मावळे, कैलास शेटे, ओंकार लाळगे, मोहन कामठे, किसन गायकवाड, संतोष मापारी, गणेश चासकर, विलास चासकर, जालिंदर लाळगे, वैजनाथ पडवळ, विशाल खैरे, राम कामठे, धनंजय लाळगे, रामकृष्ण मावळे, विकास शेळके, पांडुरंग य शेंडकर, संतोष नरसाळे, बाळासाहेब नरसाळे,

तसेच प्रत्येक गुरुवारी 12 ही महिने साई संतोषी एक्वा (अळकुटी) तर्फे मोफत पाणी जार सौजन्य, महालक्ष्मी ॲग्रो, रांधे फाटा यांच्या वतीने 12 महिने दिवा तेल याचप्रमाणे अनेक भाविक सहकार्य करत असताना दिसतात. महाप्रसाद वाढण्यासाठी अनेक युवा वर्ग आणि महिला या ठिकाणी आवर्जून सेवा करताना दिसून येतात.

महाआरती दरम्यान संपूर्ण परिसरात स्वामींचा जय जय कार आणि "दिगंबरा, दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा" या घोषणांनी वातावरण दणाणून गेले.दर्शना दरम्यान अनेक भाविकांच्या डोळ्यातून आनंदाश्रू अनावर झाले.

देवस्थांचे संस्थापक अनिल रामचंद्र आवारी आणि अध्यक्ष



सुभाष भोसले यांनी भावना व्यक्त करताना सांगितले थंडीचा कडाका आणि परिसरात निर्माण झालेली बिबट्याची भीती असूनही भाविकांची उपस्थिती कोठेही कमी झाली नाही.उलट भाविक संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. विशेष म्हणजे, महिला आणि तरुण वर्गाचा सहभाग उल्लेखनीयरीत्या वाढत आहे. अनेक भक्तांनी "इथे आल्यावर भीती नाही, फक्त स्वामींची कृपा जाणवते" असे अनुभव कथन केले.

या आध्यात्मिक सोहळ्यात शेतकरी, कष्टकरी, वारकरी, धारकरी, शासकीय अधिकारी,पोलीस व सेवा दलातील कर्मचारी,राजकीय क्षेत्रातील मान्यवर

धार्मिक आणि आध्यात्मिक पंडित,युवा वर्ग,तसेच कुटुंबासह येणारे सामान्य भाविक यांचा उपस्थितीचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. साधारणता 4 ते 5 हजार स्वामीभक्त व सेवेकरी उपस्थित होते.

# नगरच्या रेल्वे प्रकल्पांना गती द्या

■ खासदार नीलेश लंके यांचे रेल्वेमंत्र्यांना पत्र



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघातील विविध महत्त्वपूर्ण रेल्वे प्रकल्पांच्या प्रस्तावांची अद्ययावत स्थिती जाणून घेण्यासाठी खासदार नीलेश लंके यांनी केंद्राचे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना सविस्तर पत्र लिहून पाठपुरावा अधिक वेगाने करण्याची मागणी केली आहे. मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक असलेल्या आठ प्रमुख रेल्वे प्रस्तावांवर लंके यांनी तातडीने अहवाल सादर करण्याची विनंती केली आहे.

पुणे–अहिल्यानगर इंटरसिटी गाडी सुरू करण्याबाबत पूर्वी पाठवलेल्या प्रस्तावाची सद्यस्थिती कळविण्याची खासदारांनी मागणी केली आहे. या गाडीमुळे दोन्ही शहरांतील रोजगार, व्यवसाय आणि शिक्षणाच्या संधींना चालना मिळेल, असेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

अहिल्यानगर -चोंडी (जेउर–चोंडी) नवीन रेल्वे मार्गाचा प्रस्ताव गेल्या काही महिन्यांपासून प्रलंबित आहे. या प्रस्तावाच्या अभ्यास व निर्णय प्रक्रियेची स्थिती तत्काळ कळवावी, अशी लंके यांची विनंती आहे.

संभाजीनगर–अहिल्यानगर–पुणे नवीन रेल्वे लाईन या बहुप्रतिक्षित नव्या रेल्वे मार्गाबाबत वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप स्पष्ट स्थिती मिळालेली नाही. मार्गाचा सर्वेक्षण, डीपीआर, मंजुरी प्रक्रिया आणि पुढील टप्पे कोणत्या अवस्थेत आहेत, हे कळवण्याची विनंती खासदारांनी केली आहे.

### सुपा औद्योगिक परिसरात रेल्वे फ्रेट यार्ड

एमआयडीसीमधील वाढत्या औद्योगिक प्रकल्पांच्या पार्श्वभूमीवर फ्रेट यार्ड अत्यावश्यक असल्याचे लंके यांनी नमूद केले आहे. फ्रेट यार्ड उभारणीच्या प्रस्तावाची स्थिती आणि पुढील प्रक्रिया स्पष्ट करावी, अशी मागणीही पत्रातून केली आहे.

श्रीरामपूर–परळी नवीन रेल्वे मार्ग या महत्वपूर्ण प्रस्तावावर रेल्वे मंत्रालयाने कोणता निर्णय घेतला आहे, हे तातडीने कळवावे, असे खासदारांनी म्हटले आहे. राहुरी–शनिशिंगणापूर रेल्वे लाईन या मंजूर रेल्वे मार्गासाठी भू-अधिग्रहण प्रक्रिया लवकर सुरू व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. भूसंपादन कधी आणि कशा पद्धतीने होणार याबाबत माहिती देण्याची विनंती त्यांनी केली आहे.

अहिल्यानगर स्थानकाजवळील एलसी क्र. ३० येथे आरओबी बांधकामाच्या प्रस्तावाची अद्ययावत स्थिती कळवावी, अशी मागणी खासदारांनी केली आहे. अपघातमुक्त वाहतुकीसाठी हा पूल अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. राहुरी तालुक्यातील बांबोरी येथे गेट क्रमांक ३५(ब) असलेल्या ठिकाणी आरओबी मंजूर झाल्याचे नमूद करून, काम सुरू होण्याची निश्चित तारीख कळवावी, अशी विनंती लंके यांनी केली आहे.

# जादूचे प्रयोग कार्यक्रमाचे आयोजन

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**





पारनेर तालुक्यातील गांजीभोयरे येथील माने मळा येथे दत्त जयंती निमित्त व श्री. अवधूत राजू पांढरे यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधत जादूचे प्रयोग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध जादूगार प्रकाश शिरोळे यांनी जादूच्या एकसरस एक प्रयोगाने प्रेक्षकांची मने जिंकली. जादू, संमोहन, विज्ञान अशा अनेक गोष्टींना संगीत साथ दिल्याने कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढली. छोटी जादूगार कु. जादू शिरोळे हिने देखील आपल्या जादूच्या प्रयोगाने प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्साह वाढविला. याप्रसंगी सौ. रेश्मा शिरोळे , माजी सरपंच सौ. अनुराधा माने यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे मुख्य संयोजक सुप्रसिद्ध चित्रपट गीतकार अरुण वाळुंज यांनी हा कार्यक्रम प्रत्येक गावात विविध नेतृत्वाला सोबत घेत आयोजित करण्याचा निर्धार व्यक्त केला. याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य श्री. राहुल तामखडे, भाजपा नेते श्री. शब्बीरभाई इनामदार, दूध संकलन चेअरमन,खादी ग्रामोद्योग संचालक पारनेर श्री. राजू दत्तात्रय पांढरे, सुप्रसिद्ध गझलकार श्री. गणेश भोसले, गडकिल्ले अभ्यासक श्री. बाळासाहेब पठारे, उद्योजक श्री. एकनाथ गडकर, श्री. सुरेश पठारे, श्री. युवराज पांढरे, श्री. सचिन पांढरे, श्री. दादाभाऊ पांढरे, श्री. गणेश खणसे,श्री. शुभम खणसे, श्री. आनंदा पांढरे, श्री.संदिप पांढरे, श्री. नितीन माने, श्री. राजू माने, यांसह अनेक गावांतील ग्रामस्थ प्रामुख्याने उपस्थित होते श्री. राहुल तामखडे यांनी अवधूत पांढरे यांना जन्मदिवसाच्या शुभेच्छा देत असे मनोरंजन व विज्ञानाचे कार्यक्रम आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजक श्री. राजू पांढरे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# शिक्षण क्षेत्रातील उज्ज्वल दीप : भुजबळ यांचा गौरव

■ पंचायत समिती श्रीगोंदा तर्फे 'कृतिशील मुख्याध्यापक' तालुकास्तरीय पुरस्कार प्रदान





**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी अक्षरांचे ज्ञान नसून विद्यार्थ्यांच्या जीवनात उज्ज्वल प्रकाश निर्माण करणारी एक संस्कारांची प्रक्रिया आहे. हा प्रकाश जो शिक्षक आपल्या कृतीतून इतरांच्या आयुष्यात पसरवतो, तोच खऱ्या अर्थाने गुरु आणि मार्गदर्शक ठरतो. अशाच प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाचे धनी असलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या महादजी शिंदे विद्यालय व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय, श्रीगोंदा येथील प्राचार्य श्री. दिलीप दगडू भुजबळ यांना पंचायत समिती श्रीगोंदा तर्फे प्रदान करण्यात येणारा तालुकास्तरीय 'कृतिशील मुख्याध्यापक' पुरस्कार जाहीर झाल्याने संपूर्ण तालुक्यातून त्यांचे अभिनंदन होत आहे. भुजबळ सरांच्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात एक समर्पित इंग्रजी विषयाचे शिक्षक म्हणून झाली. विद्यार्थ्यांशी आत्मीय नाते जपत, विषयाची गोडी निर्माण करणारी अध्यापनशैली, शिस्तप्रिय वृत्ती व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेली मेहनत, यामुळे ते अल्पावधीतच विश्वासू मार्गदर्शक म्हणून ओळखले जाऊ लागले. यानंतर गुरुकुल प्रमुख म्हणून त्यांनी शिस्त, संस्कार आणि गुणवत्ताधारित शिक्षणाचा सुयोग्य समन्वय साधत आदर्शवत कार्य केले. उपमुख्याध्यापक पदावर कार्यरत असताना त्यांनी राबवलेला 'पाढे पाठांतर उपक्रम' विद्यार्थ्यांच्या गणितीय पायाभरणीसाठी अत्यंत उपयुक्त ठरला. विद्यार्थ्यांच्या यशाबरोबरच शिक्षक व शिक्षकेतर सेवकांमध्येही त्यांनी संघभावना निर्माण करून 'शाळा म्हणजे कुटुंब' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली.


# महापरिनिर्वाण दिनानिमित्त रक्तदान शिबिर आयोजन

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित दि.६ शनिवारी रोजी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आल्याची माहिती संयोजकांनी दिली आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रज्ञा बौद्ध विहारात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या रक्तदान शिबिरात रक्तदातांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे असे आवाहन संयोजक माजी नगराध्यक्ष प्रतिनिधी उमाकांत सरोदे अध्यक्ष सार्वजनिक भिम जयंती मंडळ यांनी केले आहे.

# डॉ. विद्याधर औटी 'जीवनगौरव' पुरस्काराने सन्मानित

■ पुरोगामी पारनेरच्या विचारवैभवाचा सन्मान!



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पुरोगामी विचार आणि सामाजिक समतेचा पुरस्कार करणाऱ्या माजी प्राचार्य डॉ. विद्याधर औटी यांना त्यांच्या अतुलनीय शैक्षणिक आणि सामाजिक योगदानाबद्दल सावित्री फातिमा सदभावना मंच परिवाराचे कार्याध्यक्ष डॉ.रफिक सय्यद आणि मारुती शेरकर यांच्या हस्ते नुकताच जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

क्रांतदर्शी महात्मा जोतीबा फुले, सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख यांचे कार्य व विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यात डॉ. औटी यांनी दिलेले योगदान अमूल्य आहे. पारनेर तालुक्याच्या विचारवैभवात भर घालणारे डॉ.औटी यांनी अनेक वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात भरीव कार्य केले आहे. विशेषतः महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख यांसारख्या थोर समाजसुधारकांनी समता, शिक्षण आणि बंधुत्वासाठी केलेल्या संघर्षाचे आणि त्यागाचे महत्त्व त्यांनी आपल्या व्याख्यानांमधून आणि लेखनातून प्रभावीपणे मांडले आहे. या तिन्ही क्रांतदर्शी व्यक्तींना एकाच व्यासपीठावर समजावून सांगण्याची त्यांची हातोटी पुरोगामी विचारांना अधिक बळ देणारी ठरली आहे. सद्भावना परिवाराने डॉ. औटी यांच्या कार्याची दखल घेऊन हा प्रतिष्ठेचा जीवनगौरव पुरस्कार त्यांना प्रदान केला. यावेळी बोलताना डॉ.रफिक सय्यद यांनी "डॉ. औटी यांनी पुरोगामी विचारांची मशाल सातत्याने तेवत ठेवली आहे. त्यांचे कार्य आजच्या समाजाला नवी दिशा देणारे आहे," असे गौरवोद्गार काढले.

पुरस्काराला उत्तर देताना डॉ. औटी यांनी या जीवनगौरवाचा स्वीकार करताना, हा सन्मान म्हणजे फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांचा सन्मान असल्याचे नम्रपणे सांगितले. पारनेरच्या भूमीत विचारांची जी मोठी परंपरा आहे, ती अधिक समृद्ध करण्यासाठी आपण यापुढेही कार्यरत राहू, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. डॉ. विद्याधर औटी यांना मिळालेल्या या सन्मानामुळे पारनेर तालुक्यातील शैक्षणिक आणि सामाजिक वर्तुळात आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण आहे..

# कुटुंबांना स्नेहालय संस्थेकडून आधार आणि मार्गदर्शन!

■ स्नेहालय उडान प्रकल्प, समुपदेशक निशा वाघ यांच्याकडून जनजागृती.



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पोटाची खळगी भरण्यासाठी आणि रोजगाराच्या शोधात परभणी आणि हिंगोली येथून पारनेर तालुक्यात स्थलांतरित झालेल्या कुटुंबांना स्नेहालय उडान प्रकल्प अहिल्यानगर यांच्या कडून मोठा आधार मिळाला आहे. स्नेहालय उडान प्रकल्प, समुपदेशक निशा वाघ यांनी नुकतीच पारनेर येथे या स्थलांतरित नागरिकांची भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

तसेच त्यांना अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या बालविवाह आणि बालकामगार या ज्वलंत विषयांवर जनजागृती केली.कामानिमित्त एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करणाऱ्या कुटुंबांचे जीवन अनेक अडचणींनी भरलेले असते. विशेषतः, शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षित निवारा यांसारख्या मूलभूत सुविधांपासून ते वंचित राहतात. परभणी आणि हिंगोली या भागातून आलेल्या या कुटुंबांच्या समस्या ऐकून घेण्यासाठी स्नेहालय संस्थेच्या समन्वयक निशा वाघ यांनी पुढाकार घेतला.त्यांनी स्थलांतरित मजुरांच्या राहण्याच्या ठिकाणांना भेटी दिल्या. या कुटुंबांची सध्याची आर्थिक परिस्थिती, मुलांचे शिक्षण आणि त्यांना भेडसावणाऱ्या आरोग्यविषयक अडचणी यांची माहिती घेतली.

अनेक कुटुंबांना रोजगाराची शाश्वती नसल्यामुळे आणि मुलांना पुरेसे पोषण मिळत नसल्यामुळे अनेक समस्यांचा सामना करावा लागत असल्याचे यावेळी दिसून आले.या भेटीदरम्यान, निशा वाघ यांनी स्थलांतरित कुटुंबांतील सदस्यांशी संवाद साधताना त्यांना दोन अत्यंत गंभीर सामाजिक समस्यांविषयी मार्गदर्शन केले. अनेकदा आर्थिक अडचणींमुळे किंवा रूढीवादी विचारांमुळे स्थलांतरित कुटुंबांमध्ये लहान वयातच मुला-मुलींचे लग्न लावून दिले जाते. वाघ यांनी याचे गंभीर परिणाम समजावून सांगितले. बालविवाह हा कायद्याने गुन्हा असून, त्यामुळे मुलींचे आरोग्य आणि शिक्षण धोक्यात येते, असे त्यांनी स्पष्ट केले. रोजगाराच्या शोधात आलेल्या कुटुंबातील मुलांनाही कामाला लावले जाते, ज्यामुळे त्यांचे बालपण हिरावले जाते आणि शिक्षणापासून ते वंचित राहतात.

मुलांना कामावर न पाठवता, त्यांना शाळेत दाखल करण्याचे आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्याची काळजी घेण्याचे आवाहन समुपदेशक निशा वाघ यांनी केले. मुलांना चांगले शिक्षण देणे हे त्यांचे सर्वात मोठे कर्तव्य आहे, हे त्यांनी पालकांना पटवून दिले.

# बालाजी देवकांबळे यांच्याकडून मिठाईचे वाटप

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

जागतिक दिव्यांग दिनाच्या निमित्ताने, दरवर्षीप्रमाणे याही वर्षी माजी सरपंच बालाजी देवकांबळे यांच्या वतीने दिव्यांगांचा सत्कार व मिठाई वाटपाचा महत्त्वपूर्ण कार्यक्रम फुलवळ येथे आयोजित करण्यात आला होता सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवत, देवकांबळे यांनी आपल्या गावातल्या अनेक दिव्यांग बांधवांना सन्मानित केले आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी दिव्यांग व्यक्तींना शाल, श्रीफळ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला, तसेच सर्वांना मिठाईचे वाटप करण्यात आले. गेली अनेक वर्षे देवकांबळे यांच्याकडून हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. यामागचा उद्देश केवळ मदत करणे नसून, या व्यक्तींच्या आत्मविश्वासाला बळ देणे आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा आहे.

# महाराष्ट्रात बेकायदेशीर धर्मांतरविरोधी कायदा लागू करण्याची नागरिक सोशल फाउंडेशनची मागणी

**पुणे : (समर्थ गांवकरी)**





राज्यात वाढत्या बेकायदेशीर धर्मांतराच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने तातडीने "महाराष्ट्र फ्रीडम ऑफ रिलीजन (Prevention of Fraud & Coercion) Act" पारित करून लागू करावा, अशी मागणी नागरिक सोशल फाउंडेशन (NSF) या सामाजिक संस्थेने केली आहे. यासंदर्भातील मागणीपत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवण्यात आल्याची माहिती ॲड. सर्वेश मेहेंदळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. पुणे श्रमिक पत्रकार संघात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या वेळी अमेय सप्रे, प्रीतम थोरवे उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात संस्थेने नमूद केले आहे की, महाराष्ट्रातील आदिवासी बहुल भाग—विशेषतः धुळे, नंदुरबार, पुणे आणि ठाणे जिल्ह्यांमध्ये—बळजबरी, फसवणूक किंवा प्रलोभनाद्वारे धर्मांतराच्या तक्रारी सातत्याने येत आहेत. अशा प्रकारचे अवैध धर्मांतर हे व्यक्तीच्या धार्मिक स्वातंत्र्यावर गदा आणणारे असून सामाजिक सौहार्दालाही गंभीर धोका निर्माण करणारे आहे.

संस्थेने स्पष्ट केले आहे की धर्मांतर हे केवळ व्यक्तीच्या श्रद्धा, स्वेच्छा आणि जाणिवेवर आधारित असावे; दबाव, फसवणूक, आर्थिक लाभ किंवा इतर प्रलोभनाद्वारे केलेले धर्मांतर अवैध ठरले पाहिजे. अशा कायद्यामुळे धार्मिक स्वातंत्र्याचा आदर राखत सर्व समुदायांचे संरक्षण, धार्मिक समरसता आणि सामाजिक शांतता दृढ होऊ शकते. तसेच परकीय निधी किंवा अनधिकृत धार्मिक बांधकामांचा गैरवापर थांबवता येईल, आणि दोषी संस्था किंवा व्यक्तींवर कठोर कारवाई करता येईल. NSF ने सुचवलेल्या विधेयकातील काही प्रमुख तरतुदी पुढीलप्रमाणे असाव्यात: धर्मपरिवर्तन हे व्यक्तीच्या वैयक्तिक श्रद्धा आणि स्वीकृतीवर आधारित असावे. दबाव, फसवणूक किंवा आर्थिक-साहित्यिक प्रलोभनाद्वारे झालेले धर्मपरिवर्तन वैध मानले जाऊ नयेत.

# गडकोटांच्या संवर्धनासाठी निधी द्या : खासदार नीलेश लंके

### छत्रपतींच्या गड–किल्ल्यांच्या दुरावस्थेवर संसदेतून हल्लाबोल!

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे प्रतीक असलेले गड–कोट किल्ले आणि त्या परिसरातील ऐतिहासिक मंदिरे आज दुरावस्थेत आहेत. या संवेदनशील प्रश्नावर शुक्रवारी लोकसभेत थेट आवाज उठवत अहिल्यानगरचे खासदार नीलेश लंके यांनी केंद्र सरकारकडे निधीची ठामपणे मागणी केली.

आपल्या घणाघाती शैलीत बोलताना खा. लंके म्हणाले, अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत, आठरा पगड जातींचे मायबाप, दुरदर्शी आणि जनतेचे राज्यकर्ते असलेले छत्रपती शिवराय! त्यांनी उभारलेले गड–कोट किल्ले ही आपली श्वास-निःश्वासातली इतिहासाची मानमरातबाची ओळख आहे. पण आज ही किल्ल्यांची स्थिती पाहवत नाही.

छत्रपतींनी उभारलेले असंख्य गड–कोट किल्ले काळाच्या ओघात जीर्ण झाले आहेत. किल्ल्यांच्या परिसरातील पुरातन मंदिरेही भग्न अवस्थेत असून अनेक ठिकाणी पर्यटकांसाठी मूलभूत सुविधा देखील नाहीत. या संवर्धनाची तातडीची गरज खा. लंके यांनी मांडली.


खासदार लंके यांनी सभागृहात स्पष्ट शब्दांत मागणी केली की, "गडकोट किल्ल्यांचे संवर्धन हे केवळ महाराष्ट्राचे नव्हे, तर देशाच्या स्वाभिमानाचे कार्य आहे. त्यामुळे केंद्र सरकारने भरीव निधी मंजूर करून गड–कोट किल्ल्यांचे

# प्रवरा परिसरातील शेतकऱ्यांचे विद्युत मोटार व केबल चोरीचे प्रमाण वाढले

### पोलिस यंत्रणेवर शेतकऱ्यांचा तीव्र संताप!

### डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून

**अकोले : (समर्थ गांवकरी)**





अकोले तालुक्यातील प्रवरा नदीपात्र परिसरातील शेतकऱ्यांचे विद्युत पंप व केबल चोरीचे सत्र दिवसेंदिवस वाढतच चालले असून चोरट्यांनी आता थेट शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारी, पंप व केबल्सवर मोर्चा वळवला आहे. अनेक दिवसांपासून या भागात मोठ्या प्रमाणात होत असलेल्या चोरीच्या घटनांमुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे.

शेतकऱ्यांनी सांगितल्याप्रमाणे, विद्युत मोटार व केबल चोरीच्या तक्रारी घेऊन पोलीस स्टेशनमध्ये गेल्यानंतर उलट पोलिसांकडून "तुमच्या मोटारी खरोखर चोरीला गेल्या का? त्याची बिले आणून दाखवा; बिले असल्यासच आम्ही गुन्हा मान्य करू" अशी उत्तरे दिली जात आहेत. यातून पोलिस यंत्रणा शेतकऱ्यांच्या वेदनेपेक्षा प्रक्रियेची कागदोपत्री अडचणच महत्त्वाची मानते, असा रोष शेतकरी व्यक्त करत आहेत.

एका रात्रीत 20 ते 22 शेतकऱ्यांचे विद्युत मोटारी व केबल चोरीस: सदर परिसरातील खालील शेतकऱ्यांचे विद्युत पंप व केबल एका रात्रीत चोरट्यांनी लंपास केल्याची माहिती मिळाली आहे :

1. हरिदास लक्ष्मण आरोटे
2. हरिदास आनंदा आरोटे
3. कैलास गणपत आरोटे
4. संतोष रामभाऊ आरोटे
5. अविनाश रंगनाथ आरोटे
6. गणेश चंद्रभान आरोटे
7. प्रेमानंद किसन आरोटे
8. यशवंत मारुती आरोटे
9. मनोहर गंगाधर आरोटे
10. लक्ष्मण विठ्ठल आरोटे
11. संजय सीताराम आरोटे
12. बाळासाहेब कानवडे
13. अशोक भिकाजी आरोटे
14. नारायण रामहरी आरोटे
15. डॉ. अतुल आरोटे
16. किरण सोनवणे
17. सुदाम रामनाथ आरोटे
18. शांताराम माकोडे
19. प्रदीप दत्तात्रय आरोटे
20. संजय गोविंद आरोटे
21. डॉ. विश्वासराव आनंदा आरोटे

या घटनेनंतर संपूर्ण प्रवरा परिसरात भीतीचे व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

चोरटे मोकाट फिरत असताना पोलिस मात्र पीडित शेतकऱ्यांनाच उलट प्रश्न विचारत आहेत, ही मोठी शोकांतिका असल्याची भावना शेतकऱ्यांत आहे. "किती जणांची मोटारे चोरीला गेल्यावर पोलीस जागे होणार? बिल आणा म्हणजेच गुन्हा मान्य करू... हे उत्तर कितपत योग्य आहे?" असा संतप्त सवाल परिसरात जोरात उमटत आहे.

नगर जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घाडगे व जिल्हा पोलीस उपअधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांनी आता तरी अकोले व राजूर पोलीस स्टेशनच्या निष्क्रियतेकडे लक्ष देऊन कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी व नागरिक करत आहेत.

चोरीने हैराण झालेला शेतकरी म्हणतो, "आम्ही शेती करायची की पोलिसांकडे बिले घेऊन पळायचे? सरकारने आणि पोलीस प्रशासनाने तरी आता आम्हा बळीराजाचा विचार करावा."

